THE … TANJORE

वामन पंडितं कृत.

Krishna charita by Vamana pandita. Part I

कृष्णचरित्र

श्लोक

भाग १

रा. रा. परशुराम बल्लाल गोडबोले

यांच्या साहाय्यानें

शुद्ध करून

माधव चंद्रोबा

यानीं

लोककल्याणार्थ

स्वताच्या

शिलाछापखान्यांत छापिला

मुंबई.

शके १७८२



अनुक्रमणिका

	पृष्ठ
कृष्ण जन्म	१
मृत्तिका भक्षण	६
उखल बंधन	८
बालक्रीडा	१९
वनसुधा	३९
हरिविलास	६१
स्फुट श्लोक	१४२

वामनपंडितकृत

[illegible]ष्णजन्म

करुनि नमन एका देव-देवा हरीतें,–
भव-भय अवघेंही नाम ज्याचें हरीतें –
हरिविण इतरांतें सेवितां बद्ध होतो –
कथिन, चरित रूपें, व्यास-भावार्थ, हो, तो
नेऊनि नंद-सदनांत हरि स्व-हातें,
माया–व्रजेश-तनया–तिस ने गृहातें;
आणी अजा, त्यजुनि अन्य गृहीं अजाला,
तों बद्ध मागुति, पहा, वसुदेव झाला! २

कथेमाजि या तत्व हें व्यास-देवें असें दाविलें जें, पहावें सदैवें.
हरी जन्मला तेथुनी हे कथा, रे; तरे, या चरित्रीं जरी चित्त धारे.
प्रहर दोनि निशा विमल-क्षणीं, प्रगटला.–निज-उत्तम-लक्षणीं
दिसतसे भुवनत्रय-पालक, त्रिदश-नायक, अद्भुत बालक
नयन सुंदर ते श्रवणांवधी; विमल-दृष्टि अजा त्रिगुणा वधी
प्रगटला अति-अद्भुत बालक,–विधिपिता जग-चालक, पालक. ५
भुजा चारि; हातीं धरी शंखचक्रें; गमे सिद्ध मारावया दैत्य-चक्रें.
गृहीं दीप्ति त्या अद्भुता बालकाची दिसे, सर्व लोकांचिया पालकाची.

श्रीवत्सयुक्त उर, सुंदर, [illegible]शावाचा,
वर्णूं शके न गुण ज्यांतिल लेश वाचा;

---

१ आदिशक्ति; अविद्या, -२ व्रज-ईश-नंद, -३ जन्मरहित-माया, -४ जन्मरहिता-कृष्णास, -५ निर्मल-क्षणीं-शुभमुहूर्तीं, -६ देवांचा नायक, -७ आकर्ण, कर्णपर्यंत; -८ दैत्यसमुदाय,

शोभे गळां परम कौस्तुभ भासमान;
ज्योतीस ये न रविची अनिशो समान. ७
कनक[3]वसन, यावा ज्यांत सौदा[4]मिनीचा
घन[5]तनु-वरि वास-श्रीजग-स्वामिनीचा;
श्रवणिं मणिकिरीटी कुंडलें सुप्रभातें,—
तरुण-अरुण-शोभा जेविं फांके प्रभातें
शोभे कटीं जडित, सुंदर रत्न-कांची,
श्रीअंगदें-मणिमयें-सह मुद्रिकांचीं;—
ऐसी तनू परम-अद्भुत बालकाची
देखे यदूत्तमपिता-जगपालकाची
आनंद-सिंधु सलिलांत निमग्न झाला
देखोनि शूर[11]-सुत तो स्वसुता अजाला:
सप्रेम तो हळुहळू गुण केशवाचे
वर्णून, कंस भयही कथि लेशवाचे.

व्रजा जाउनी नंद-गेहीं रमाया, असी घालुनी आपुली स्वैर माया
म्हणे, "नंद कन्येसि आणूनि ठेवा, व्रजीं आपुला देह नेऊनि ठेवा." *

---

१ तेजस्वी, — २ अत्यंत तेज, — ३ पीतांबर, — ४ विपुल तेजाचा, — ५ मेघासारिखें शरीर, — ६ कमरेंत, — ७ कमरपट्टा, — ८ भूषणें, — ९ रत्नखचित, — १० उदकांत, — ११ वसुदेव.

* एका हस्तलेखी पुस्तकांत अकराव्या श्लोकापुढें हा श्लोक आहे:—

"ऐसें वदूनि जनका-यदुवंशजाला, सद्यप्रसूतजन बालकरूप झाला;
वेषांतरें नट जसा निज-भाव दावी, ते ईशशक्तिगति अद्भुत ती वदावी."

परंतु दोन तीन दुसऱ्या पुस्तकांत तो नाहीं, म्हणून इथें ग्रंथांत घेतला नाहीं.

'ने गोकुळासि मज'-ऐ रिति-देव-देवें
आज्ञापिला निज-पिता-वसुदेव-देवें.
विष्णुत्व दाउनि, शिशू जलजाक्ष झाला,
तों चालिलाचि उचलूनि अधोक्षजाला.
उचलुनि हरि जों तो होय सानंद जाया,
प्रसवलि गुणमाया गोकुळीं नंद-जाया;-
त्रिभुवन-पतिची ते शक्ति, हो, योगनिद्रा
करि सकळ जनांतें भ्रांति[illegible]निद्रा. १३
निशा अर्ध नाहींच लोक-प्रवृत्ती, विशेषें बुडाल्या तमीं-दीप्र-वृत्ती;
करी द्वारपाळां महा गाढ-निद्रा, जसी जन्मली गोकुळीं योगनिद्रा. १४
जयां ठेवी द्वारीं बहु[illegible] खळ-खळां,
तयां लागे निद्रा; गळति कुलुपें, हो, सकळकळां
निघे बेडी घेतां उचलुनि घनःशाम लहरी,
भव-ग्रंथी ज्याची परिहरि कृपासिंधु-लहरी. १५
कवाडें लोहाचीं न निघति कधीं जेविं निकरें,
घणीं जीं लोहारीं बसविलिं खिळे ठोकुनि करें;
असंधानें शस्त्र प्रभु उचलितां ती उघडती;-
कटाक्षें कृष्णाच्या अघटित विचित्रेंचि घडती. १६
हळुहळु घन गर्जे, तीव्र वर्षोनि धारी,
दश-शत-फणि त्यानें छत्ररूपें निवारी.

१जलज-भव कमलनेत्र,— २अवसाय ३ मध्य रात्रीत, ४सारिल,—५खळ-कीस,—६दुष्टां द्वारपाळां,— ७ संसाररूपग्रंथी,— ८उदक,—९शेष,—× जीविका.—नित

सखिबहिण यमाची क्रूर त्याहूनि वाटे,
भय मनिं वसुदेवें मानिलें फार वाटे . १७

उघडितां क्षण, माशुति लौकरी, सुरपती अति-वृष्टि जगीं करी;
जन-भयानक होय यमानुजा, बहु सफेन-जलाकुल-भानुजा. १८

शतें आवर्तांचीं; अचल चलती चंचल गती-
असे मोठे फेने भ्रमति,-उदकें त्यांत फुगती;
नदी ते दे मार्ग स्थिरपतिस तेव्हां झडकरी, —
जसा झाल्या सेतू, जलधि पथ रामार्पण करी १९.

शुभांगी जसी विंचरीते शुभांगा, द्विधा केश सारी, करी ओश भांगा.—
कलिंदात्मजेचें तसें होय पाणी, पथें त्या पिता ने शिशू चक्रपाणी. २०

नंद-व्रजा-प्रति असा वसुदेव देवा
आणी सुखेंचि यमुनेंतुनि देवदेवा,
तों झोंप गोवळ-जनां अति, गोपि कांहीं;
गेला गृहांत, न कळेचि तथापि कांहीं. २१

यशोदेसि होतां सुता योग-निद्रा, समस्तां स्त्रियां युक्त ये गाढ निद्रा;
नजाणेचि ते पुत्रि कीं पुत्र कांहीं, न ते लक्षिली आणिकां बायकांहीं. २२

यशोदेपुढें ठेउनी कृष्णजीतें, गृहा ने तिला ने म्हणे कृष्णजीतें
स्वभार्येपुढें तीस आणूनि घाली, पदीं त्याचि बेडी क्षणीं त्या निघाली. २३

ये जा गृहींच उचलूनि अधोक्षजाला,
बेडी निघोनि अति सत्वर मोक्ष झाला;

१ यमुना नदी,— २ फेनयुक्त उदक ज्यात,— ३ सूर्यकन्या, यमुना,— ४ भोंवऱ्याची,— ५ पर्वत ६ फेंस,— ७ समुद्र,— ८ मार्ग,— ९ तरित,— × दोन भाग,— * माया.

कृष्णजन्म

माया तयाच सदनीं भरि शृंखलांला,
जागें करी स्वरुदितेंचि तयां खळांला. २४
हरी ठेवी, माया उचलुनि, गृहा ये झडकरी;
हरीच्याही बाच्या चरणिं दृढ ते बंधन करी.
हरीच्या आज्ञेंही करुनि इतरांतें न यजि जे,
अनन्यें सद्भक्ती: करुनि हरि तेंच्याचि भजिजे. २५
निघालीसे वाटे क्षण, चरणिं बेडी तरि पडे;
न बंधाचा फंद त्रिभुवन-पती-चीण उपडे.
जईं राया कंसा, गज-वधुनि, मल्लासह वधी,
पुन्हा कृष्णप्राप्ती करुनि सुटका ते निरवधी. २६
हरीं वामनाचा हरी क्षिप्र बंध; स्वनामेंचि जो हा तयाचा प्रबंध,
कथा-तत्व-नामें जगीं हो प्रसिद्ध; प्रकर्षें जथा वर्णिती विप्र, सिद्ध

१ बापाच्या, - २ यजनन करी, - ३ अनंत, - ४ कृष्ण, - ५ हरण करी, - ६ रुदनानें.

वामनपंडित

मृत्तिकाभक्षण

स्वउदरांत चराचर मृत्तिका, पसरुनी मुख दाविल कौतुका.
प्रगट जो करि वात्स्य-कृपा-रसा, नमिन त्या हरिच्या पदसारसा.
गोप-बालक गडी, बळिराम, क्रीडतां हरिसवें अभिराम,
'मृत्तिका सुत तुझा घननीळा भक्षिला'—वदति हें जननीला.
न रागेजणारी कधीं नंदराणी, करी कृष्ण खोडी तिला हे शिरोणी,
नहीं मृत्तिका भक्षितां कृष्ण जीतें दटावी—चढे क्रोध अत्यंत जीतें. ३

कर-श्रीकांताच्या करकरुनि माता धरि करें;
दुजा हस्त क्रोधें हरिवरि उगारूनि निकरें
दटावी; तेव्हां भय चकित डोळे करि हरी;
करी अंडत्रासें वरि कर दुजा—जो भय हरी. ४

असीं कोटि अंडें जयामाजि माती, तया 'खादली कां,' म्हणे, आणि माती.
मुखश्री करूनी हरी दीनवाणी, असत्यांतही बोलतो सत्य वाणी.
"माती नाहीं खादली म्यां, यशोदे! या सर्वांची गोष्टि मिथ्या असो दे
मिथ्या तूतें ज्येष्ठही बंधु सांगे; जो, तो, याचा शब्द मिथ्या असा गे.
"जाण हे अनृत सर्व वैखरी; मानिसी जरि, तथापिही, खरी,
भक्षिया निजमुखाकडे तरी दृष्टि दे—वरवि वाक्य अंतरीं."
मृषा लोक वाणी, मृषा अर्थ तीचा; खरा अर्थ तो वेदवाणी श्रुतीचा;
असे ती मुखीं आपुल्या वेद-याच्या, पहा तीस;—आश्चर्य—ती माधवाच्या. ८
असत्य हें बोलति सर्व वाचा, साचा असा शब्दहि माधवाचा;

---

१ पद- सारस-चरणकमल. २ रागें भरणारी,— ३ आवड-कौतुक, ४ हातानें,— ५ असत्य.

मृत्तिकाभक्षण

असत्य हें भाग्य बोलिलों कीं, सत्यही सर्व असत्य, लोकीं
मृषा तरी हा व्यवहार साचा, यालागिं या वाक्यसुधारसाचा.
मिथ्या दिसे भाव, म्हणूनि दावी पोटींच माती – मति हे वदावी.
तसे खादली, खाउनी मृत्तिका ही, म्हणे-या स्ववाक्यासि मिथ्यत्व कांहीं
दिसे; तें हराया [illegible] पोटांत सारे तिला दाखवी मृत्तिकेचे पसारे. ११
पोटांत बाहेरुनि जें निघेना, तें भक्षणभाव म्हणोनि-घेना;
म्हणोनि, हे मृन्मय-लोक सारे पोटांत-हे दाखविले पसारे. १२
हरीची असी वेदवाणी पुराणी-न जाणोनि, मानी मृषा [illegible] –
अहो, विश्व जो दाखवी पांडवासी, म्हणे त्यासि-साचा तरी तोंड वासी
कीं मृत्तिका हे अधरीच, माते, आधींच माझ्या उदरांत मोते. –
ते भक्षिली कां म्हणसील मातें, नेणोनि ऐसा [illegible] ? १[illegible]
असा आपुला शब्द तो देव साचा. करूं पाहतो, त्या कथेच्या रसाचा
पहा भाव तो मातृशब्दीं हरी तो असत्यत्व हें आचरूनी हरी तो. १५
एवं, पहातां अजि कोटि अब्दीं न येचि मिथ्यत्व मुकुंद-शब्दीं:–
तें आयका यावरि माय काय बोलों शके, दाखवि विश्वकाय. १६
घटाकार आकार मातींत माती, –असी माणसे सर्वही ज्यांत माती
अशा विश्वरूपा, मुकुंदा, उदारा, दटावी धरूनी करीं गोपदारा! १७
म्हणे, पूससी ओष्ठ चाटूनि चोटा! पुन्हा बोलसी धीट गोष्टी अचाट!
घडीही घरीं पाय तूझा न थारे, न आटोपसी तूं मला सर्वथा, रे. १८
पसरुनी मुख दाखविसी मला तरि खरा मज वाटसि, रे मुला.'' –
म्हणउनी जननीवचनें हरी पसरुनी मुख संशय संहरी. १९

१ सहींत,– २ आहे,– ३ भावते,– ४ पर्वांत,– ५ वाचाळ,– ६ भ्रम.

वदनिंजों अवलोकुनि पाहते, जननि विस्मित होउनि राहते;
स्थिरचरात्मक हें जग देखिलें; स्वसुत ईश्वर हें मनिं रेखिलें. २०
यशोदेसि हें तत्व दाऊनि देवें, पुन्हा घातला मोह त्या वासुदेवें;
कडे घेतला मागुती पुत्रभावें, यथापूर्व पाहे तयातें स्वभावें. २१
असीं कौतुकें शेषशायी हरी तो करीतो, कथेनें अविद्या हरीतो.
कथेच्या रसें शुद्ध केलें मनाला; कलीमाजि या तारिलें वामनाला. २२

उखलबंधन.

धरि, नसोनिहि, रज्जु भुजंगमा;-धरि अशा रितिं जो स्थिरजंगमा,
उखळ-रज्जु, तया प्रभुच्या कटीं!-भ्रम हरी हरितो भवसंकटीं. १
करुनि वंदन त्या पुरुषोत्तमा, कथिन बाल्यकथा-अति-उत्तमा.-
सगुण, सुंदर आकृति-आकुटी; उखळ त्या प्रभुमूर्तिचिया कटीं.
सकळ गुंतलिया गृह-किंकरी, मथन ते समई जननी करी;
स्वसुत-बाल्य-चरित्रचि गातसे;-हरि कथा, जन हो, तुम्हि गा तसे.
स्व-सुत-बाल्य-चरित्र महोदधी स्मरत, गात, करवें मथि, हो, दधी.
रुचत भक्ति च, कीं जननीच ते; समजतीन कथीं जन नीच ते.
पृथु नितंब नितंबिनिचावरी कटि तरीं कटिसूत्रचि सांवरी;
कनक-कंकण-द्वंद्वहि वाजती, मुखिं सुरव श्रम-बिंदु विराजती.

अज्ञान, माया,- २ दासी,- ३ महा-उदधी-महाराग,- ४ स्थूल,-
५ स्त्री ६ समुदाय.

उखळबंधन.

श्रवणींचे श्रवणीं नग हालती;
गळति गुंफिलिया शिरिं मालती;
घुसळितां कुचकुंभहि कांपती,–
अमृत ज्यांतिल ये कमळापती. ६

फिरवि ने रविलें दधिभीतरी,
भिरवि ते रवि-तेज नगांवरी,
स्फुरि ते करि चंचलता मनीं,
उपरमे परमेश्वर गायनीं. ७

"आइ, म्यां उगवतांच रवीला,
दाट घालुनि दहीं चरवीला,
त्यांत, गे, फिरवितांच रवीला,
[6]सार काढुनि हरी चरवीला[7]." ८

मथी एकभावें, असी गाय माय;
स्तनीं प्रेम-पान्हा निघ्यां काय मांय?
अशामाजि ये सर्व-संसार साक्षी
असे जे स्थळीं गोपिका सारसाक्षी. ९

फुटे प्रेम-पान्हा, भिजे आंत चोळी;
हरी हा नि मानूनि ते, हात चोळी:
धरी भक्तिनें अर्पिल्याची स्पृहा हा,
म्हणोनी म्हणे, "व्यर्थ जानें, अहाहा!" १०

---

१ अलंकारावर,– २ स्थिरावे,– ३ सूर्यास,– ४ दधिमंथनपात्र,– ५ मंथन काठीस,– ६ नवनीत,– ७ चारिला,– ८ भावे,– ९ सारस-अक्ष- कमललोचना.

न घेवचे व्यापक-चित्स्वरूपें,
न घेवचे तो रस साक्षिरूपें,
पुनरत-रूपासि जयासि दावी,
ते भोक्तता त्याचि मुखें-वदावी. ११
जननिच्या स्तन-दुग्ध-रसार्पणें
स्व-सुख, तृप्तिहि, मानिचि तर्पणें;
ह्मणि असा रस जाय गळोनियां,
ह्मणुनि घे हरि हेंचि कळोनियां. १२
"क्षुधित मी,- स्तन दे मज लौकरी."
ह्मणुनियां रवि गाढ धरी करीं.
त्वरित बैसुनि दे स्तन नागरी;-
मन जिचें बुडतें सुख-सागरीं. १३
मुख-सुखाऽमृत-रश्मि पहातसे.-
तुम्हिहि कां स्वमनीं न पहातसें?
परि तयासहि टाकुनि धांवतें;-
तुम्हिहि ध्याउ ह्मणी, अजि, धांव तें. १४
त्रि-भुवनाऽधिक राज्यहि ये केरा,
त्यजुनि तें, हरिभक्तिचि हे करा.-
जरि बुडोनि समस्तहि जातसे,
तरि बुडो.- हरिनेंचि भजा तसे. १५

---

१ नागरिक स्त्री - २ मुखरूपा सुखकारक अमृतकिरण चंद्र,- ३ हातीं.

कृतापराधें प्रभु स्[illegible]ें .
करी, परी त्या मधु-सूदनातें
करीं; उगारी तरि वेत्र भारी,
कांपे भयें,-देखुनि कैठभारी. ३६

अहो, लोचनीं पूर आहे जळाचा,
मुखीं मावळा रंग तो काजळाचा;
मुखा ऊपरी नाचवी आड पाणी,
भयें ताडणाच्या प्रभू चक्रपाणी. ३७

नील-पंकज-तनू[1] सुकुमारा-
देखतां, अजि, अशास[2] कुमारा,
वेत्र दाखवि जरी घननीला[3],
हाणवे न तरि त्या जननीला. ३८

संत्रस्त[4] तो देखियला मुरारी,
उगारितां वेत्र भयें थरारी;
टाकूनि काठी, मधु-सूदनातें
बांधूं म्हणे; त्या निज-नंदनातें. ३९

न कामना ज्यास, न वासना ही,
प्रेमेंविना बंधन त्यास नाहीं;-
तें प्रेम वाहे हृदयांत माय,
दाव्यांत तीच्या म्हणऊनि माय ४०

---

१ निळ्या कमळाप्रमाणें ज्याचा देह,- २ पुत्रास ,-३ मेघश्याम,-४ फारत्रास लेलासा

ब्रम्हांडकोटीं न कदापि मोता,
बांधों तयातें शकतीच माता;-
वार्त्ता असीज्या स्वजनीं वदावी,
आधीं अबद्धत्व तयास दावी. ४१
हा अनंतचि, तथापि हि लोकीं
बाळ-रूप जननी अवलोकी;
बद्ध हा म्हणाति येरिति जाणा,
दाखवी तदपि त्यासि स्वजाणा. ४२
ऐवं- द्विधा कौतुक देव दावी;-
कथा असी हे रुचिनें वदावी.
नबांधवे कोवि तया प्रकारा
वदों- कसा बंधहि निर्विकारा. ४३
आधींच दावें उखळास माय
बांधी, न त्या- माजि मुकुंद माय;-
बांधी जसें कां इतरा नरा हे,-
तों दोनि बोटें व्यवधान राहे! ४४
पाठीकडे उखळ आणुनि, मध्यभागीं
पोटाकडे जननि अंग्र-युगीं विभागीं;
देईन गांठि म्हणतां न पुरेचि दावें!
त्या नंतरें नवल होइल तें वदावें. ४५

१भावना,- २असें,- ३दोन प्रकारचें,- ४अंतर- कमी,- ५दोन शोवटांनीं,-

दावें दुजें जोडुनि त्यासि गाय
बांधे, तरी त्यांत हरी न माय ;
बांधेच दावीं आवघ्या गृहाचीं
तरी उणे ये! नवलाव हाची . ४६

जें तें उणें अंगुळ दोनि माजी, –
आश्चर्य तें गोप-वधू-समाजीं ;
मानेसही विस्मय फार वाटे ;
तरी न ये बुद्धि विचार वाटे . ४७

न आदि, ना मध्य, न अंत ज्याला ;
बांधे कसें कोण तया अजाला ?
जरी स्वयें सर्व जगांत माता,
ते बांधिती यत्न करूनि माता . ४८

हें तत्व नेणोनि चि कष्ट भारी
माता करी, देखुनि कंठभारी,
दया कटाक्षें जननीस पाहे ;–
बांधोन ये दाखवि तें कृपा हे ४९

कीं मुक्ति बद्धांसहि देव देतो,
जे आत्म विद्या गुरु दे, वदे तो
मुक्त स्वयें मुक्तिहि दे, अहो, तो ;
प्रेमे तयाचा प्रभु बद्ध होतो . ५०

---

१ गोपाळांच्यास्त्रीसमुदाया मध्यें २ मावता ३ स्वकर्मानें बंधन पावणारांस.

प्रसाद मोठा[1] विधि पावला, हो;
परंतु त्यालागिंहि देव लाहो
न दे असा;-आणि शिवादिकांहीं
न वश्य हा देव अनादि कांहीं. ५१
उरीं सदा श्री जगदेक माता.
गुणीं तिच्या ये घडि एक.-माता
गोपि . सादांश तई तिला, हो,
होतां, रमेलाहि अतर्क्य लाहो. ५२
एवंच लक्ष्मी-कमलासना ही
प्रसाद ऐसा कवणासि नाहीं;
बांधोनि ये गोळणिच्याच हातीं;-
ब्रम्हा, रमा, कौतुक हें पहाती. ५३
बांधे यशोदा बहुतां उपाईं;-
यत्ना-विणें वामन त्या कृपाईं
प्रेमेंच बांधे, अजि, आयत्यानें;
केलें न जाणो तप काय त्यानें. ५४

ब्रम्हा   १ लक्ष्मीला आणि ब्रम्हदेवाला

नारदपंडितकृतबाळक्रीडा

घडे घेउनी कृष्णनाथा उदारा,
गृह-द्वार-देशीं उभी नंद-दारा;
मिळे बायकोमात्र तेथें व्रजाची,—
जयां पुत्र तीचा, अवो, तीव्र जाची
शिखीं जसा वेणु वनींच पेटे,—
गा ह्याणियांचे उठती चपेटे;
चित्तें मुकुंदीं अति सानुरागा;
मुखीं मृषा दाविति तीव्र रागा. २
वदनिं कोप मृषा जरि वावरे,
सरस हास्य तथापि नआवरे;
न लपणारचि अभ्रक-पंजरीं,
लपविली जसि दीपक-मंजरी. ३
वरी क्रोध, सप्रेम पोटांत नारी;
अपांगें अशा लक्षिती पूतनारी;
यशोदेप्रती त्याचिया लोक-लीळा,
अहो, वर्णिती— नाशिती ज्या कलीला. ४
'कडे तूझिया दी[illegible] साधु हा, गे,
मुते उंबरा आ[illegible]चा, आणि हागे;

शेंड्यावर २ज्योति.

पडे [illegible] पाय, वो त्याचि माजी,
करी हास्य तेव्हां मुलांचा समाजीं.
"बरें गोड तें सर्व चोरूनि खातो; -
कळे ठाव, जो [illegible] आणिकां, तो.
दधी, दूध भक्षूनि, दे मर्कटांतें;
करूनी तयां तृप्त, फोडी घटांतें.
"प्रकाश देहें करि केंव्हभाऊरी, -
भारी तनू ज्योति तमीं उभारी;
भा रीघने जे गगनीं रवीची,
वीचि-प्रभा सिंधुचिया छवीची".
देखोनि हें सांगति कृष्ण-माते
कीं, "दीप्ति त्याची न गृहांत माते. -
प्रभा रवीहूनि नभांत दावी-
ते गोष्टि याची किति हो वदावी!
"हानाः यान्च्या नव जाय कांहीं
केलें असें ज्या गृहवाय कांहीं,
त्यांच्या मुलां ताडण उग्र हातें
करी, म्हणे, 'जाळिन या गृहातें.'
"घरीं ज्या न हानास कांहींच लागे,
करी तो वहू जाच त्यांच्या मुलां, गे.

१ कांती २ लहरि ३ कांतीची ४ मावतें.

रितीं भोजनें फोडुनी, कांटमोरे
गळां घालितो, आणि घेतो चिमोरे १०
निद्रितांसि चरणीं तुडवीतो,
लेंकुरें उठउनी रडवीतो,
थुंकुनी भरितसे वदनातें,
आग लाविन' म्हणे 'सदनातें'. ११
नाहींच केलें [illegible] कांहीं
ज्या गेहिंचा कश्मल नायकांहीं, –
न बिंदु जेथें मज गोरसाचा,
न गेह तें, दुर्गति मार्ग साचा!' १२
"जो बैसतो राखत, तो, ग्रहातें,
तो सोडितो वत्स सवेंच हातें;
तीं वासरें ना चरती न गाई,
परोपरी हा छळितो, अगाई! १३
व्यग्र स्त्रिया करुनि सर्व परूं-समाजीं,
चोरी असे करित त्या सदना चिमोजी;
एवंच राखतहि ज्या वसतो गृहातें,
त्या आंत गोरस सडा करितो स्वहातें. १४
"शिंकीं न पावे जरि हात याचा,
करीतसे यत्न महा नयाचा:

मांडीं २ चिमणावाळ.

पिठ्यांवरी ठेउनि ऊखळातें,
खातो; जपावें कितिकी खळातें?" १५
इत्यादि खोडी जरि बायकांहीं
निरोपिल्या, त्या वरि माय कांहीं
न क्रोध दावी; मुख कृष्णजीचें
पाहे.- स्मरें चित्त न उष्ण जीचें.- १६
सभय नयन जों जों दाखवी लोकरीती,
विषद चरित गोपी त्याचि तों तों करीती;
स्वमुख[*] जननि जेव्हां प्रेम संयुक्त पाहे,
कडकडुनि वदे हा, मानुनीयां रुपा हे. १७
मातेसही बोलतसे हरी तो,
तीचें, तयांचें मन जो हरीतो;
"माते-" म्हणे-"हें लटिकेंचि सारें,-
या बायकांचीं वचनें असारें[२]. १८
"नाना कुचेष्टा मजसीं करीती,
उरीं कठोरीं हृद कुस्करीती;
देती बळें चाउनि दाम दातें,
सोसूं किती या प्रमदा-मदातें[३]! १९
"अधर[४] चाटुनियां प्रमदा पिती;
तुज वदेन म्हणे, तरि दापिती;

१ कोपलेलें, २ असत्य ३ मत्तस्त्रियांचा मद ४ ओष्ठ.

* स्मरमुख असाहि एक पाठ आहे.

म्हणति सर्व वधू-जन त्यींकरें
"भुजचि मारवुं, रे, जननीकरें." २०

* * *

"गोष्टीवदों आणिक काय, माये
असोन त्या एक. मनींन माये;
उरांज जैसे रुततीं मला, गे,
न वज्र-हारी-मणि, हेम, लागे." २२
आणीक बोले ज्ञाणि पूतनाऽरी,
म्हणोनियां तत्पद-पूत-नारी
फोफावती मोहुनि नंदराणी,—
जिला हरीच्या चरितीं शिराणी. २३
कीं, "बोल हे घेउनि नंदनाचे
तूं नाचसी, बापहि नंद नाचे.
परंतु लाबाड कराल याला—
ऐशा गुणाच्या मकराऽलयाला २४
"लबाड आम्हांतहि हा असा, गे,
करूनि गोष्टी लटिक्याचि सांगे;"

सर्वस्त्री समुदाय,- २ पूतनेचाशत्रु, ३ लबाड, ४ समुद्राला.

२१ वाश्लोक. फार बीभत्स वाटला म्हणून ग्रंथांतून टाकला आहे. आम्ही आमच्या वाचणारांस एथें एकदांच सुचवितों कीं जेथें अशा प्रकारची कविता येईल ती नेहमी ग्रंथांतून गाळून टाकली आहे.

ऐसा धिटा या बहु बोलतां, हे
वाचा नव्हे, कृत्रिमता लता हे २५
'एवं' पदीं श्रीहरि बोलिला हें
टीका भले वाचिति त्यासि लाहे;
प्रत्यक्ष माते प्रति जें वदेना,
तयास 'एवं' 'प्रति' भाव देना. २६
एवंपदास जिहि एव मर्थ;
श्रोते विचारूत भले समर्थ
कथा असी हे बहुतां पुराणीं
गातां स्पर्धेची पुरवी शिराणी २७
आतां यशोदेप्रति गोपजाया,[1]
पूर्वोक्त-चेष्टा-कृत-दोष जाया,
परोपरीं वर्णिति कृष्णजीच्या
लीला-स्मरें जें स्वमनास जीच्या २८
एवं यशोदेप्रति गोप-दारा,
असत्यता लाउनि त्या उदारा,[2]
आणीक शब्द प्रभु-माधवाचे,
मृषा म्हणोनी, वदती स्ववाचे. २९
"आम्ही म्हणो यास-विवाहकाळीं
वधू पहावी तुज तुल्य काळी;

१गोपिका २उदारकृष्णाला.

कीं गोपकन्यासम गौरवर्णी,
तोव्हां म्हणे,'आयिक काय वर्णीं ३०
सौंदरत्व सुर-मानव-लोकीं
जीचिया लव-कृपा-अवलोकीं ;
मी तिचें सुख-निधान; वरीते
नित्य नूतन मला नवरी ते. ३१
'मी विरक्त, मजला नवरी ते ;
दाटुनीच वरिते मजला ते ;
राहते मजचि माजि सदा ते
सेविती वरदही जिस दाते ३२
'ब्राम्हणें बडविलें मज लातें,
त्या स्थळांतहि भजे मजलां ते ;
तेंचि ते मज गमे न असोसी
काय या उपरि अन्य असोशी ? ३३
'हार दे मज उदार मणीचा,
क्षीरे-नीरनिधि, या रमणीचा
नेदखें करिलसा सरि याची
ऐसिया सधन सासरियाची. ३४
'शा सागरहे न सा सुर वाडी
नित्य जांत-अशि सासुर वाडी ;

भृगूनें हृदयावर १क्षीरसागर २दिसतनाहीं.

द्वीप, चंदन, अशोक, विराजे ;-
ज्यासि वर्णिति कवी, ऋषि, राजे .’ ३५
“इत्यादि लाबाड असे असाच,
हेही नसें मानि मि काय साच?-
धुंडोनि खातो जन-गोरसा, गे;
आश्चर्य तेव्हां नरि थोर सांगे :- ३६
‘वधुनि असुर आणी वेद, धुंडूनि पाणी ;
प्रलय जलधि मध्यें मत्स्य मी चक्र-पाणी
दधि, घृत लपवीती काय दे हीनवाणी,’-
म्हणाउनि वदतो, गे, काय हे सत्य वाणी? ३७
“आणिखी विविध दैत्य-कचारें
सांगतो हलुहलुच अचारें,-
आपणाचवरि वर्त्तवितो, गे, -
सर्व बाष्कळचि वेर्त्त वितो, गे. ३८
“जसिच गोष्टि निघे, तसि लोकरी
प्रगट एक नवीच कथा करी;
घुसळितां सदनीं दधि बायका,
हलुचि ‘गोष्टि’ म्हणे ‘तुम्हि आयका. ३९
‘आहो वधूजन!’ म्हणे ‘मथितां दधीतें,
‘म्यां येरिती घुसळिलें अमृतो दधीतें;

---

१ गोष्ट .

केली रवी, म्हणतसे, कनकाऽचळाची, -
दोरी तयास फणिच्या मणि चंचळांची. ४०
'निराधार चाले तळीं अद्रि भारी;
न त्या देव-दैत्यांत कोणही उभारी;
तई होउनी कूर्म दुग्धांबु-डोहीं,
धरीं पाठिसी त्यांसि नेदी बुडोंही. ४१
'फिरविजे रवि जेविं वधू-गणीं,
अचळ तो चळतो फणिच्या गुणीं;
तनुस ते नुसते मुख घर्षतां, -
विरमतें, रमतें, मन हर्षतां. ४२
'लक्ष्मी निघाली मथितां समुद्रा,
मानें न कोण्हांचिहि तीस मुद्रा;
निर्दोष इच्छी च न आपणातें
वरीन त्यातें, -- करि या पणातें. ४३
'ब्रम्हा वृद्ध, सकाम; कामरिपु तो रुद्र श्मशानीं वसे;
दैत्यभक्त सुरेंद्र इंद्र गुरुही इंद्राभिमानी असे;
दुर्वासादि अशांत शांत मजही जो कांत इच्छीच ना,
माला, हें कमला विचारुनि, गळां अर्पी जगज्जीवना. ४४
'इच्छीना मंजला सुरासुर भला ऐसा दिसेना मला,
आशेशीं रमला जिच्या नर, तिला तो दाससा भासल;

---

१ पर्वत, - २ समुदायानीं, - ३ कामातुर, - ४ मदनशत्रुशिव, - ५ लक्ष्मी.

श्रीवत्सादि मला शिरे, न शमला; ऐसा घनः ामला
माळा, हें कमला विचारुनि, गळां घाली जगन्मंगळ. ४५

'कादी तसा, तुम्हि जशा नवनीत सारा;
म्यां शोधिला अमृत-रत्न[1]-कदंब सारा;
लोणी मुलांस तुम्हि चारितसा स्वधामीं,
पाजी सुरां, युवति होउनियां, सुधा मी ४६

'सुधा कुंभ जो लाधला देव-जाती,
हिरोनी बळें, दैत्य घेऊनि जाती;
तई मोहिनी होउनी अंगनाचे[2]
करीं भाव,-नानापरी अंग नाचे. ४७

'बळी त्यांत तो निर्बळांलागि दापी,
म्हणे हें न दे आणिकांतें कदापि;-
अकस्मात ते देखती सर्व मातें,
स्मरें[3] मोहिले, पावले विभ्रमातें. ४८

'मजचि पाहुनि, ते न सुधा पिती;
घटचि तो करिं आणुनि अर्पिती;
म्हणति-पाजिशि वांटुनि तूं जशी,
पिउं तसे, क्रमुनी क्षण तूजसीं. ४९

सुर असुर तई मी बैसवीं वेगळाले,-
सहज-रिपु तन्ही ते भाव त्यांचे ळाले.

---

१ अमृतरत्नांचा समुदाय, -२ सुंदरास्त्रियेचे, -३ कामानें.

सकल मज पहाती, जाणती देव-राजे,-
असुर युवतिवेषें मोहती जेविं राजे. ५०

'सुधा-पात्र घेऊनि रंभोरु हातें,
त्वरें वाढितां मी, सुखांभोरुहातें
सुरारी पहातां, दिसे चंचळाला
स्तन श्री; हरी वायु वस्त्रांचळाला. ५१

'घे मी सुधा-कलश वाम-कराबुजानें
वाढावया;-इतर पात्र धरीं दुजानें,-
तों कंचुकी सुटतसे, व [illegible]ला
वारा हरी, दिसत सुस्तन चंचलांला. ५२

'सुकुच कुंकुम-चर्चित देखिले,-
मृग-मदें अतिसुंदर रेखिलें,-
असुर ते स्मरविह्वल मी करीं,
अमृत दे त्रिदशांप्रति लोकरीं. ५३

'म्हणति-दाउनि वक्त्र-विधू वधू
अमृत सर्व न दे तमधू-वधू;
तरि मनें सुतलीं सुख-सारसा,
गमतसे न सुधारस सारसा. ५४

'असुर लंपट वक्त्रसुधा करीं;
अमृत दे अमरांप्रति लोकरी;

---

१ स्त्री वेष,- २ अमृताचें भांडें,- ३ सु[illegible],- ४ सुख चंद्राचे गार्या,- ५ कमळा

म्हणुनि दे फळ कल्पतरूप मी,
विषम अर्थ न कल्प तरूपमी[×]
'अमृत अमर प्याले तो न होतां विलंब;
प्रगट दिसति चाऱ्ही बाहु आजानु[#] लंब;
उरिं उदधि-सुता[1] श्री, शोभती शंख चक्रें;
"हर! हर! हरि कीं हा," बोलती दैत्य-चक्रें[2].
'करातें जोडू नी विनित विनता-पुत्र[*] जवळी
उभा, स्कंधीं त्यांचा त्वरित चढतां व्योम[**] कवळी;
शिरिं दापी दैत्या पद गरुड; तैसाचि अमरीं
पुन्हा ध्यातां आलों;-असुर वधिले फार समरीं. ५७
'उभा पक्षी स्कंधीं चरणतल रातोत्पल दळीं;-
दळीं ऐसे पाडीं सुररिपु जसा वायु कदळी
दळी धान्यें जातें दळुनि तशिं शिरें म्यां भरडिलीं
स्वचक्रें,-तीं चक्रें पळत मृत-नाथास रडलीं.
'बहू भांडला दैत्य जो काळनेमी,
यमाच्या गृहा, होउनी काळ, ने मी;
तई जो रणीं दानवाध्यक्ष मेला,
स्वयें कंस तो भार झाला क्षमेला
'सुगंधीवरी पाप दुर्गंध राहे,
रडे गाय होऊनि तेव्हां धरा हे;

---

१ समुद्रकन्या २ सैन्यात,- × कल्पवृक्षाचीउपमाजास # गुडग्यापर्यंत पोचणारे,- * गरुड,- ** आकाश,-

विधि[1] प्रार्थितां, यादवीं जन्मलों कीं;
करूं कंस-विध्वंसही मृत्यु-लोकीं ६०
भूभार धाता मजला निवेदी
कृष्णावतारार्थ म्हणूनि वेदीं;
कंसाचिया त्याचि पुन्हा वधा मी
तनू धरीं हे वसुदेव-धामीं.—' ६१
"इत्यादि लाबाड वदे जसाच,
हेंही तसें मानिसि काय साच?"
गोपीस हा जों परिहार वाटे,
तों येरवरी जाय स्वऱ्याच वाटे. ६२
"दावी, अहो, चपळ आदि-वराह; ठेवी
दाढेसि काष्ठ,-वरि वेष्टुनि वस्त्र ठेवी;
रांगोनि दारवाधि मुसांडिहि सूकराची
मोटी, अगे, चपळता गुदघे-करांची! ६३
"बाह्लोल्यांचें फोडितो पोट हा, गे;
अंकीं,-तेव्हां लेंकरूं-मात्र हा गे.
आम्ही दोनी जाति बाळें पळूनी;
बाई, आम्हां त्रास वाटे कळूनी. ६४
"गुडघियावरि होय उभा, सये;
नवल, केवळ वामन भास ये

१ ब्रह्मा.

कपट चंचल चालत बोलतो-
रडतियांसहि हांसवि बोल तो. ६५

"गळां सूत, नेसूनि आंगोस्त्रातें,
म्हणे,'मारिलें क्षत्रियां दुस्तरांतें;-
कुठारेंचि या छेदलें कंठकांतें',
म्हणे घेउनी, गे, करीं कंट कांतें. ६६

"धनु करुनि तुईचें चांगलें ठाण मांडी;
पुढिल सरळ जंघा, वांकुडी वाम-मांडी;
श्रवणवरि करातें ने, भवास्त्रास भंगी,
घडिभरि मुरली घे ठाण मांडी त्रिभंगी. ६७

"घेतों भरूनि यमुनेंतुनि कुंभ पाणी,
तों ये, वदे हळुचि गोष्टि, धरूनि पाणी;-
'कीं घागरी उचलित्या उदकीं वधूनी,-
मी उद्धरीं क्षिति तसी असुरां वधूनी.'

"फळ चिरडुं जरि बाळक, कांकडी,
नृहरि आकृति दाखवि रोकडी;
म्हणतसे,'अरि काढुनि आंतडी,
असुर म्यां वधिला अति तांतडी.' ६८

"पति-चरण धुतां, गे, सत्कथा वामनाची
करुनि, हरित तेव्हां वृत्ति, बाई, मनाची;

शिव धनुपाला.

स्वपद म्हणतसे कीं 'धूय धांता असाची.
धरिसि जवळ माथा तें म्हणे गोष्टि साची.' ७०

"जो तात-आज्ञेंत न पुत्र वागे,
हा त्याचिया जाचितसे जिवा.गें;
'मी तात-शब्दें निज माय मारीं'—
ऐसें करी शासन त्या कुमारीं. ७१

'गेलों वना, करूनि गोष्टि खरी पित्याची;
जो स्त्रीस वश्यहि सकाम तथापि त्याची;
आणि, प्रजांतहि म्हणे मज लागिं तातें
संस्थापिलें सुवचना स्व अनुव्रतातें ७२

"हा विष्णु सर्वैक्यपणें तसाच.—
पिता तरी नंदचि यास साच.—
एवं मृषा सर्व विवर्त भीतो;
ओईक जें होईक वर्त्तवी तो. ७३

ज्यांच्या घरीं चौर्य करीं न लागे
हा त्याचिया जाचितसे मुला.गें;
करूनियां बद्ध, शिरोरुहांतें
लुंचा म्हणे 'आपुलियाचि हातें.' ७४

'उपडितां निज केश हि जो रडे
करवि, दापुनि, लोचन कोरडे.

१ ब्रम्हा, २ ऐकीव ३ होणारें ४ केशांतें

बहुत दुःख मनीं जरि कालवे,
भिउनि यास, तयांस न बोलवे. ७५

“म्हणे ‘मला नेदिति गोरसा जे,
हा धर्म त्यांचाचि मुलांस साजे;’—
लुंचूनि हे केश खराभिमानी—
चाऊनियां दांत मताऽभिमानी.’ ७६

“करूनी, अवो, अश्व कागी, कुमारां
करी फोक घेऊनियां त्यां कुमारा;
दिसे तो करीं खड्ग जाणों कृपाणी.
म्हणे,‘म्लेंछ हे; कल्कि मी खड्गपाणी. ७७

‘न गृहिं ज्या मज गोरस सांपडे,
त्वरित नास्तिक बोध्य ठसा पडे;
म्हणुनि होउनि कल्कि तयां वधीं,—
मग’; म्हणे, ‘बरची धरि मावधी.’ ७८

‘ज्याच्या घरीं गोरस हा न लाहे,
त्याच्याकरी जाच असे मुला हे.
मेलेच जाणों पडती कुमार,—
दे अश्व लोटूनि तूझा कुमार. ७९

“जेंजें करी. तें शिशुवृंद सोशी;
पुन्हां धरी याचिच, गो, असोशी;

स्थळीं स्थळीं पाडुनि त्यां मुलां, गे,
मध्यें हयारूढ फिरोंच लागे. ८०

"मग म्हणे 'जरि इंद्रिय-गोरसें
जन न तृप्त करी मज, यो, रसें,
वधिन होउनि कल्कि नयां असा
श्रवण-कीर्तनिं त्यां करितां असा. ८१

"सर्वां नयांत जरि एक असेल साच,
हा शब्द होउनि असत्य हि, हो, नसाच.
हें ही असो-परि, अयो, तुज, नंद-राणी,
नाहींत काय विदितें स्फलजे घराणी? ८२

"अहो यशोदे, तुज सर्व ठाव्या
गोष्टी, तरी काय अश्या उगाव्या?
रंगा विणें ही दिसतो वसासा,
भीतो झणी आइकतील सासा. ८३

"तूं काय हें आइकसील वाणी?
एथें असत्यास नसेच वाणी.
सर्वज्ञ, हो, नंद, -तथापि त्यासी
ऐसेंचि हा बोलतसे पित्यासी. ८४

'स्रष्टा जनाचा, स्व पितामहाचा,
तया चतुर्वक्त्र-पित महाचा,

ठाऊक २ ब्रम्ह्याचा ४ सासू.

मी बाप' बाई, म्हणतो 'पित्यासी.'
त्या वाड वाटे न तथापि त्यासी. ८५
'मी मायही, बाप चतुर्मुखाचा;'—
"हा शब्द याच्याचि असे मुखाचा.
नाभींत, गे, पंकज जाणवीतो,—
जाणों तया हाच सुजाण वीतो. ८६
"न बोलवे, अगे, तुजसी काय वाणी?
न गोष्टींत याच्या असत्यास वाणी.
'सहस्रानर्नी आपुली सेज हा, गे,
वदे; आणि बाळां तयांमाजि हागे. ८७

/ × × × × × × × ×

अगाई! जांवाई अमृत जलधीचा म्हणवितो,
वितो विश्वातें तो स्वकृत विधि-हेंही मिरवितो;
असाही गोळ्हीं लपवित दुधातें तदपि तो
पितो चोर्यें; राजा म्हणवुनि नृणातें खुरपितो! ८.
"दुग्धाब्धि ज्याचा ससरा सखा, तो
चोरूनियां गोरस घांस खातो;
ज्याचे उरीं नित्य पद्मा रमा, तो
गोपीउरीं सदुपहार मातो. ९०
"देखोनि मी रांजण पूर्ण-पाणी,

---

१ शेष. २ उणेपण.

तो मत्स एकार्णवि चक्रपाणी!
जो थापटूं हे न वळे, असा, गे,
पाठीं धरी मंदर. खेद सांगे! ११
स्वयें हा न घे आंत घालूनि पाणी.
ह्मणे रांजणामाजि या फार पाणी;
असा प्याड एकार्णवांमाजि भारी.
ह्मणे उद्धरीं भूमि-हा केवि भारी! १२
नख दुखे.निज आंगदिचा कसा
न स्फुटतो; तुज बाळक तो कसा
करुं हे असुराम चिरी कसा?
सकळ शब्द,अगे,वदतो असा १३
ब्रम्हांड मंदित असें ह्मणतो स्वपाय
शिंका दहीं घृत नया करितो उपायें
निःक्षत्रिया क्षिति करी फरशें करूनी
तो हा कुऱ्हाड उचलूं नशके धरूनी। १४
स्वयंवरीं त्र्यंबक चाप हाती
रंगांत भंगी,-नृपती पहाती;
तो हा न मोडी मृदु इक्षुदंडा
या कल्पना जाणतसे उदंडा १५
भिउनि किंकर किंकर किंकरा
करि पिता वरदान भयंकरा

धरूनि ग्रासाहू जा जग अक्रमीं,
वधिल त्यासि असाचि पराक्रमी. १६
"चरण चवडियां, तेवीं करांच्या तळांतें,
चुकउनि सकळांगें, लाउनी भूतळातें;
उडत उडत चाले पालथा जेविं मासा,
खद खद खद हांसे.-हांसतां ये उमासा. १७
"वरि गिरि फिरतां जो लोचनीं भाव दावी
किति म्हणउनि, बाई, कूर्मता ते वदावी!
बुबुळ युगुळ चाळी, जे डोळ्यांत भावी,-
करि नवल चरित्रें मागिलीं आणि भावी.
"बाळंतिनी पुढिल घेउनि बाळकातें,
मानेंतळीं हळुचि घालुनियां करातें.
'मी गोकुळासि वसुदेव अधोक्षजा या
नेऊनि, आणिन' विते जिस नंदजाया. १९
"पसरवि बहु वस्त्रें-कीं नदी भानुजा ते,
बुडउनि हि तटातें जे म्हणे तीव्र जाते;
ढकलुनि पट पायें यांत लाहान सा, गे,
'मज असि यमुनेनें दीधली वाट' सांगे. २०
"दावी जसीं हीं लटकींच ठाणें
तेंसीच आम्हांवरि ही उखाणें;
न वत्स चारी. अझुनी, न गाई,

१ सूर्यकन्या यमुना.

लबाड हा तोचि असा, अगाई! १०१

'माझा मृषा सर्वहि भाव लीला
हा अर्थ गोपी-वचना वळीला
हे कृष्ण आत्मा प्रिय या मनाचा,
प्रकाश जो नित्य नवा मनाचा. १०२

वनसुधा.

स्वगति दे अतिदुष्ट अघासुरा,
स्मर, मना, हट त्या अनघा[1] सुरा[2].
प्रभु ऋणी जरि दे परमा गती,
स्व[illegible]च ते नर मागती.
भक्तां निमित्त चि अघासहि मोक्ष झाला;
भक्तांसि देउनि हि मोक्ष अधोक्षजाला
वाटे असेंचि, 'मजला ऋण त्या जनाचें.'-
भक्तप्रियत्व इतुकें भव-भंजनाचें.

---

१ अन-अघ-निष्पाप ऐसा २ देवा

भक्तानिमित्तें वदनीं निघाला,
दिल्हा तरी मोक्षचि त्या अघाला;
तो भक्तिनें कां स्वमुखीं न घाला?
पडेल दुःखावरि सद्य घाला.
मारूनि अज्ञान-अघासुराला,
स्वानंद दे वत्सप बाळकांला;
स्व नामघोषें वदनें हरी तो
निघे; स्वनामें अघ तो हरीतो.
येतां मुखांत अघमूळ अघासुराला,
नासूनि, देइल सुखें अनघां सुगंला,
वाग्वह्नि; कीर्तनभरें सुरराज टाळी
वाजेल,- जें सकळ विघ्न समाज टाळी.
गोबुद्धिसंततिच, इंद्रियवत्सपाळा.
जे देव पाळिति तयांसहि वत्सपाळां
पापें अघेंचि गिळिलें;- तरि यां हरी तो
तोंडांत कीं अघ अघासुर जो हरीतो.
येथें पहा तुम्हि कथा असिकृष्णजीची,
द्वैपायन स्तुति करी मुनि-कृष्ण-जीची;
सांगे कथा शुकहि तेंचि परिक्षितीनें,
जे उद्धरी अजि तया उपरि क्षितीनें.

---

१ गोपाळ, २ पातकमूळ, ३ समुदाय, ४ गाई ह्याच केवळ बुद्धिसंतती, ५ इंद्रियें हींच केवळ वत्सांच्या समुदाय

पिऊनि सविषही, हो, पूतनेच्या स्तनातें.
भुनि धरि जननीचें श्रीगोदाहस्त नातें;
निज-परम-पदातें जो स्वधिरां जनां दे.
गुणरहित विकुंठीं श्रीमहाराज नांदे.
राक्षसी जरि म्हणों जन नीचीं,
दे मुकुंद पदवी जननीची;
सद्य ने स्वपरमा सदनातें,—
तें खरें करि सुखप्रद नातें. ९
स्वलोकास ज्या ने हरी पूतनेला,
करूनी तिचा बंधुही पूत नेला;
तयाही बका: धाकुटा ये व्रजाला.
तया शोक त्याचा महातीव्र झाला. १०
घाली झणी, व्रजजनांवरि दैत्य घाला;
मारूं म्हणे हरि वनांतचि त्या अघाला;
त्या कारणेंचि वनभोजन हेतु केला,
माता दह्यांसि न शिव्या हरि जो भुकेला ११
एवं-व्रजापति अघासुर दुष्ट याचा,—
त्याचा वनांत हरूनी, बळ-गर्व याचा;
यान्नागिं जाय विपिनास, उठे प्रभातें;
न स्पष्ट जों वरवि होय रवि-प्रभा ते १२

१ गोपाळकृष्ण. २ पवित्र. ३ नीच.

बोले मुलांप्रति हरी पहिले दिशीं कीं,
"रात्रींच सिद्ध करणें अशनादि शिंकीं;
जाऊं समस्तहि उद्यां वनभोजनातें."—
पोटांत भाव वधणें अघ-दुर्जनातें. १३
एके दिनीं मनिं धरूनि असें, हरी तो
चाले प्रभातसमयीं, खळ जो हरी तो;
शृंगीरवें चि करि जागृत मित्रसेना.—
देणार जागृतिस ज्याविण, हो, असेना. १४
खडबडोनि समस्तहि धांवले,
सहित-वत्स हरीप्रति पावले;
सकळ खेळति सोडुनि वासरां,—
परम कौतुक जें गगनीं सुरां. १५
वनीं खेळती बाळ ते बल्लवांचे,
तुरे खोविती मस्तकीं पल्लवांचे;
फुलांचे गळां घालिती दिव्य हार,
स्वनाथासवें ते करीती विहार. १६
स्वकौशल्य ज्या गुंजमाळांत नाना,
गळां घालिती ते करीती तनाना;
शिरीं बांधिती मोरपत्रें विचित्रें,
शरीरावरी रेखती दिव्य चित्रें. १७

१शिंगवाजवून, २गोपाळांचे, ३क्रीडा.

नसोनी उणें रत्न-मुक्तां,सुवर्णां,
उगाळूनियां मृत्तिकावर्ण वर्णां,
तनू रेखिती.-कृष्ण ही लोकरीती
करी चित्र देहीं,जसे ते करीती. १८
हरिहि आपण त्यांतचि खेळतो,
म्हणुनि वर्णितसे शुक खेळ तो;
चहुंकडे करिती नवल स्थितीं,
परि हरीसचि सर्वहि लक्षिती. १९
पहायास शोभा मृगां काननांची,
पुढें मूर्ति जातां मृगां·काननांची,
गडी त्या चतुर्वक्त्र-बापास होतीं
धरीतीच धांवोनि निष्पाप होती २०
धांवोनि लावी पहिलें करानें,
श्रेष्ठत्व दे त्या अजि लेंकरानें;
जो तो म्हणे,'लावीन मीच पाणी;
धरीन आधीं प्रभु चक्रपाणी.' २१
परोपरी खेळति,जी,वनांत;
अर्पूनि चित्तें जगजीवनांत;
धरूनियां मर्कटपुच्छ हातीं,
तयां सवें वृक्ष उडों पहाती. २२

---

१ च[illegible]ची, २ हातानें, ४ रंगास.

मुखें वासूनी, लोचन भ्रू नटानें
उभारूनियां; वांकुल्या मर्कटानें,
अहो, दाविती; शब्द जैसे करीती;
असें खेळती बाळ निःशंकरीती. २३
खगांचिया साउलिच्याच संगें
ते धांवती, हास्य-रस-प्रसंगें;
हंसांचिया दाखविती गतीने
जे लाधले हंसगुरू गतीनें. २४
वनी देखती मेघनीळास मोर,
प्रमोदें करी नृत्य-लीला समोर;
तयासारिखे नाचती तोकें सारे,—
खुणावूनि अन्योन्य कीं, तो कसा रे २५
जसे दांभिक ज्ञानमुद्रा धरीती,—
जना दाविती ध्यान ही बोधरीती,—
तसी दाविती ते बकाभ्यासमुद्रा;
गडी हांसवीती कृपेच्या समुद्रा. २६
उडत उडत चाले जेविं मंडूकजाती,
उकड बसति तैसे त्यासवें तीव्र जाती;
न बहु पसरितां ते हस्तपादादि, पाणी
तरति नवल पायें; हांसती चक्रपाणी. २७

१ बालक, २ आनंदानें.

नामप्रतापें घनसन्निभांच्या
प्रांशुध्वनी देति दिशा नभांच्या,
तों तों बळें गर्जति लोक सारे, -
तुम्ही न गर्जा ध्वनि तो कसा रे ! २८

रमति, हांसति हास्यरसें असे,
निज मनो-गत ज्यांस जसें असे;
करिच तो वनिं खेळ, अहो, तसे;
विमळ जे स्मरतां मन होतसे.

वदे शुकाचार्य परिक्षितीतें
कीं, "धन्य, राया, करिती क्षितीतें;
श्रीमूर्ति जे ब्रह्मस्वरूपानुभूती,
ती गोवऱ्या खेळति त्या विभूती. ३०

'संतासि जें ब्रह्म स्वरूपानुभूती,
दासांसि तें दैवत सर्वभूतीं;
जना दिसे बाळक लोकरीती,
क्रीडा तयासीं शिशु ते करीती. ३१

"अलभ्य ज्याचा पदरेणु सिद्धां,
योगेश्वरां लागुनि ही प्रसिद्धां,
प्रत्यक्ष तो शेषहि, हो, स्ववाचा
वर्णूं शकेना व्रज-वैभवाचा." ३२

१ मेघतुल्यांच्या.

वदे शुकाचार्य असेंचि राया.
की,"धासरें सोडुनियां चराया,
क्रीडा अशा श्रीहरिशीं करीती,-
अलोकभाग्यें परि लोकरीती." ३३
स्वजनजीवन, दैत्यअजीवनीं,
सगुण तो व्रजराज,अजी,वनीं
रमतसे;जरि त्या जगजीवनीं
मन बुडे,न बुडे मृगजीवनीं. ३४
वनचरित्र सुधा व्रजकाननीं
करुनि,तें हरि वामन-आननीं
हरिच वोतुनि वैभव दे तसें;
अमृतबिंदु हरीच वदे तसे. ३५
ग्रंथ हा वनसुधा रचला,हो;
दे सुधेहुनि हि फारच लाहो;
'जो वनांत हरि हा रमला,हो,
दे तसे स्वयश-हार मला,हो. ३६

अध्याय २

स्थिर चरात्मक[1] जो अवघा हरी,

---

१ स्थावरजंगमात्मक

स्वजनजीवन- हेतु अघा हरी;
सकळ सुरद्रुम, कामदुघा, सुरा,
स्मर मना वधि जेंवि अघासुरा १

रस पहाति नभीं अवघे सुर,
सरित ये इतुक्यांत अघासुर;
दुरुनि लक्षितसे खळ खेळ तो
बकबकीरिपु ज्यांसह खेळतो २

त्या मुलांत हरिचा प्रताप तो
देखतां, भय मनींच तापतो;
"हा" म्हणे "भगिनि-बंधु-घातकी,—
मीच एक उरलों तिघांत कीं! ३

यां मुलांसहित यास गिळावें,
तें गिळूनि न पुन्हा उगळावें;
दो निमित्त न वधीं जरि सारे,
क्रोध दारुण शमेल कसा, रे? ४

"करुनियां तिळ यासह लेंकुरें,
नरडिच्या रुधिरें सलिलें करें
बरवि देइन आजि तिळांजळी;
करिन तृप्त बकी, बक, याजळीं."
परंतु हातें जरि हे वधावे,

१ बकासुर आणि पूतना यांचा शत्रु-कृष्ण.

कोण्ही, ह्मणी, घेउनि जीव धांवे,
म्हणोनि पोरांच कलाप सारा
निघे असा, हां, पसरी पसारा ६
ऐसें विचारूनि च राजवाटे
निजे, -पहातां गिरिराज वाटे!
मोठा धरी देह भुजंगमाचा,
जो नाशकर्ता स्थिरजंगमाचा. ७
अध; अजगर मोठा, तोंड वासूनि वाटे
शयन करि, मुलांना तुच्छ होऊनि वाटे
न फणि, परि फ़णीसा दीसतो हा स्वरूपी,
म्हणउनि शिशुवृंदें स्वैरभावें निरूपी. ८
म्हणति "दुष्ट भुजंग असे खरा,
तरि भिऊं न तया खळशेखरा;
सकळ यांत निघों तरि काय, हां,
करिल सर्प भयानक-काय, हो? ९
निघोंनि पाहों घडि एक सारे,
गिळील आम्हां खळ हा कसा, रे?
शिरावरी श्री-भुजराज हा कीं-
जो मृत्यु-काळा सकळांस हाकी?" १०
म्हणति एक "गिळी जरि साप हा,

---

१ जमाव, २ स्वेच्छ, ३ दुष्टशिरोमणि, ४ देह.

घरिं मधेंचि मरेल कसा, पहा.
गिळुनि टाकि जसाचि बका क्षणें,
वधिल त्यासि, पहा, कमळेक्षणें. ११
जरि असा अजि निश्चय सांपडे
अजित सर्व म्हणोनि तसा पडे,
अयफणांसहि हारें दिसे हरी, —
भय बकी बक जो निमिषें हरी. १२

अध्याय ३

हरिकथा परिसा अतिपावनी, —
करि, पहा, कसि त्यासि कृपा वनीं;
भरवसा धरितां हरिचा, हरी
भव भयानकसा, अजि, संहरी.
देखोनियां दुष्ट अघास वीटे,
त्यांआंत जावें अवघ्यांस वाटे;
नानाध्वनीयुक्त अभिष्ट टाळी
ती ते वाजविती स्वअभिष्ट टाळी,
गडी सर्व टाळी-रवें केशवाचे

---

१ मार्गांत

असे धांवती; श्रीहृषीकेश वाचे :
सवें हांकिलें वृंदही वासरांचें,
भयें कांपले देह सर्वां सुरांचे.
मुखीं सुरांच्या गगनीं "अहाहा!
"अनर्थ झाला," म्हणती, "पहा, हा
परंतु रक्षील हरि प्रभावें;"—
झाले उगे मानुनि याच भावें.
पोटीं सवत्स शिशु-वृंद जरी निघाला,
नाहीं तयांत हरि, हें कळलें अघाला;
यावा मुकुंद म्हणऊनिच वाट पाहे,
हें देखतां हरिस उद्भवली कृपा हे.
देखोनि मानित असे हरि विस्मयानें,
कीं सर्प हा करिल दारुण भस्म यांतें;
जाळील, लाविल न हा असुर क्षणातें;
यांच्या तरी करिन मी असु-[1]रक्षणातें.
निज-बळ-मद सर्व खळांस मी;
विषमता न सुरां असुरां समीं;
म्हणुनि होतिल दैत्यविषें मृतें,—
परि तयां उठवीन कृपाऽमृतें.
गृहसुखीं निघणें जरि म[2]ज्जना

१ प्राणरक्षणास. २ मद्- जन-माझ्याजनास.

तरि करीन भवांऽबुधि मज्जना;
स्वकृतभोग घडेच जरी खरा,
तरि न बाधक साधक शेखरा
गृहरती जरि होति सुखावहा,
तरि म्हणे मज रक्षिल देव हा;
जरि अचूक सुखासुख पावतो,
तरि तया बुडवीच न भाव तो
ऐसें जरी अजगरोदर-वन्हि-जाळें
हें नाश पावतिल तत्क्षण, वत्स जाळें;
वर्षोनि त्यांउपर मी स्वकृपाऽमृतातें
रक्षीन, मारुनि अघासुर, यां मृतांतें. १०
विचारूनि ऐशा कृपेनें हरी तो
स्वयें जो रिघे, जो खळां संहरीतो;
पडे भक्त त्यामाजि घाली स्वदेहा,—
जया आपुलें देव सर्वस्व दे हा, ११
पडे ज्यांत भक्त, स्वयें त्यांत टाकी
उडी, आणि काढूनि आणी तटाकीं
जगीं ख्यात ऐसी कराया, हरी तो
रिघे त्यांत,—जो त्या खळा संहरीतो. १२
मृत्यु जे घडिस होय अघाला.

१बुडणें २किनाऱ्यावरः

प्राण ते क्षणिच य अनधाला;
"दोनि एकसमयींच कराया
जाय त्यांत," म्हणतो शक्र, "राया." १३
प्रथम उठवितां हे देखनी जों तयातें,
न जिति निज गडी तों केंवि मारूं तयातें?
करिं शरण न रक्षी तो दुजें काम घेना,
उभयहि न घडे हें त्यांत जों मी निघेना. १४
स्वभक्तांसि जो देव सर्वस्व दे हा,
अघाच्या मुखीं वाढवी तो स्वदेहा;
जया वायु दाटे तसें दुःख वाटे;
निघे प्राण तो ब्रम्हरंध्राच वाटे. १५
हरीच्या स्मृतीनें तनूत्याग होतो,
न ये मागुती गर्भवासा, अहो, तो.
हरिस्पर्श देहावरानीं अघाला,-
म्हणोनी न देहांतरीं तो निघाला. १६
हरीस्पर्श त्याचा अगण्या दिसांचा
करी भस्म हो पाप-पुण्यादि सांचा.
समीरासवें ज्योति त्याची निघे, ते
न कोण्ही परी देह जाऊनि घेते. १७
बऱ्या पुण्यदेहास पुण्यें सजावें;

* वायूबरोबर. ** 'यास्थानें' – असाहि एक पाठ आहे.

अघें यातनेच्या शरीरास जावें;
तें दोन्हीं तरीं कृष्णरूपीं भरावें,
श्रुती बोलती शब्द संदर्भ भावें. १८

भुजंगांतुनी मूर्त्ति जेव्हां निघाली,
अघज्योति ही तप्त येऊनि घाली
तयांतूनि बाहेर जो देव यावा
नभीं दाखवी तेज तो दिव्य यावा १९

सवत्सें मुलें जीं मृतें, त्यांस देवें
पहातांचि, तीं उठती, हो, सदैवें.
तयां-युक्त बाहेर जेव्हां निघाला,
हरी मुक्ति दे ज्योतिरूपें अघाला. २०

स्तवीती नभीं देव कीं, देवराया
अजी, पावलें हीं कुशीं दे वराया;"
पडे पुष्प-वृष्टी वना नंदनाची,
उभी मूर्त्ति नंदाचिया नंदनाची. २१

बाहेर ये अघासुरांतुनि एकवेळे,
लंघी नभा विबुधनाद, समुद्र वेळे.
वाद्यां स्वरांत जयशब्द, "नमो नमो जी!
संतोष तो दशशतानन ही न मोजी. २२

तो सत्यलोकांत विधातयाला

१समुद्र वेला मर्यादा, धनकल्लोळ चढे २सहस्रवदनशेष ३ब्रह्मदेवास.

ये आयको नादकथा तयाला;
निमेष होई इतुक्यांत पाहे
येऊनियां श्रीहरिची कृपा हे २३
स्वभक्त-रक्षार्थ सुखीं निघाला;
जे योगियां, ते गति दे अघाला;
अंतीं सुखा ये गति दे जना मी,
महात्म दावी व्रजराज नामीं. २४
घनतनु दनुजारी, वस्त्र हा पीत साजे;
स्तविति सुर विमानीं, देखती हो नसा जे;
झळकति वनमाळा, रत्नराजी विराजे;
जलदरुचि, पहा, तो,-थोर तो देवराजे! २५
अजि, अभक्त- अघासुर आननीं
हरि शिरे, गति दे व्रजकाननीं;
हरि कथेंत सुखीं हरि तो निघे
निजसुखींच न कां मिसळूनि घे? २६

अध्याय ४

जो आहुती वैदिक विप्र-मित्रा

१ मेघश्याम दैत्यरिपु २ पिवळें.

नेथे मुखीं देव मुखीं प्रसिद्धा;
तो गोपबाळार्पित खाय ग्रांस
श्रीकृष्ण, जो संहरि, हो, अघास!
भक्तां जसा सुलभ, अन्य जनास नाहीं;
सौरभ्य हें न कमळा, कमळासना ही;
कीं लाभ नाम वदनीं जरि एक थारे,
आतां पहा हरिचि तारक सत्वमा रे
देऊनियां मुक्ति अघास देवें,
मुलें सवें घेउनि तीं सदैवें
सरोवराच्या बरव्या तटातें
आला हरी, नाशुनि संकटातें.
अजित काय मुलांप्रति बोलतो,
अजि तसाचि धरा मनिं बोल तो;
स्वगडियांस वदे वचनामृता
करि सजीवहि जेविं जना मृता
म्हणे कृष्ण त्यां बाळसंतां, "पहा रे
हरे या स्थळीं सर्व संताप-हारे.
करीं ठाव, खेळाचि या संपदा ह्या,
जया वाळवंटीं घडे संप दाहा.
पहा हे महाशीतल, स्वच्छ वाळू,

रुचे अन्न एथें, क्षुधा तुच्छ वाळू
पहा साउली दाट केवीं द्रुमाची;
नव्या पल्लवीं श्री, पहा, विद्रुमाची[1].
"स्वपदींच[2] पद्मालया[3] श्री जळाला
करी देखतां दाह जातो जळाला;
न नीरास[4] हे स्वच्छता मानसाच्या[5],
गती ज्यांत संतांचिया मानसां .

झाडें पुण्यफळें करूनि सफळें, केळीं बरीं पोफळें,
नारेळें सजळें, विचित्र उजळें हीं रम्य सीताफळें,
तैसीं हीं प्रबळें स्वसंचितबळें जीं तुंबळें जांबळें,
पुष्पें हीं विमळें, अशो बकुळें कुंदादिकांचीं कुळें.
पाळी-युक्त तळीं, असीं न सुतळीं, स्वर्गीं, न वा भूतळीं
यायूतें विमळीं जळीं सकमळीं जों पाळिती शीतळीं;
अंत-बाह्य अली महाशतदळीं गावळी सांवळी;
बिंदू त्याच दळीं कसा डळमळी, घे पैंज मुक्ताफळीं

वदे कृष्ण गोप बाळां जनातें,
"बसूनी करूं ये स्थळीं भोजनातें
वनीं वत्स सोडा चरायासि, पाणी
तयां पाजुनी यां," म्हणे चक्रपाणी

१पोंवळ्याची २आपल्या पायींच ३लक्ष्मी ४उदकास ५मानस सरोवराच्या

वरें कृष्णाजी बोलसी तूं जसा रे
तसें वर्त्ततों लक्षितों तूज सारे
असें जेविती सोडुनी वासरां
नभीं होय आश्चर्य सर्वां सुरांतें ११
तयाचीं फळें त्यांमुळांचीं तथीं कीं
अहो सोडिती सर्व निश्चिंत शिंकीं
हरीभोंवती मांडितां भोजनातें
वदे व्यास जे पंक्ति शोभे जनातें १२
शिंकाच कोणही अन्नानें करीती
पत्रा‌ळी एक अनेक रीती
कित्येक दुर्वांकुर दर्भ कांहीं
केलीं स्वपात्रें व्रज अर्भकांहीं १३
निजमुख कवणाही आडदृष्टीं असेना
रचुनि बसवि ऐसी भोंवती बाळसेना
हरि-वदन पहाया सर्व दृष्टी भुकेल्या
ह्मणुनि बहुतपंक्ती मंडळाकार केल्या १४
गळाला असे सर्व देहाभिमान
स्वसंस्कारशेषें क्वचित् वर्तमान
असा चीमणा देह वाटे जनातं
बहू कृष्ण सामीप्य त्या वासनांत १५
बहु खुजे अतिवामन हो गडी

तनु जशा भवसागर सांगडी
स्वनिकटत्व तयां बहु देव दे
कवळ दे निज-गुह्य तयां वदे १६
अलंकार मिथ्या गमे हेंचि साच
स्वसंस्कारशेषें दिसे तो नसाच
असा जो खुजांगी स्वदेहाभिमान
प्रभू वैसवी त्यांस साम्यें समान १७
प्रारब्ध योगें जऱ्हि भोग साच
क्षणेक वाटे तऱ्हि तो नसाच
मिथ्या पहाती बहू दुर दृष्टीं
कीं भोग कर्मानु गुणें अदृष्टीं १८
अहं कर्त्तृता आणि तें कर्म साच
स्वयें मानितो अज्ञ जैसा नसाच
स्वभोक्तृत्व ही भोगही सत्य मानी
न जाणोनि हें वर्म देहाभिमानी १९
अहं कर्त्तृता भोक्तृतेलागिं दावी
तऱ्ही ज्ञानकाळीं मृषा ते वदावी
खरें मानिलें कर्म तो भोग वाटे
जऱ्ही चालतो विश्व मिथ्यत्व वाटे २०
प्रारब्ध तें निश्चित भोग दावी
भोगी तऱ्ही [illegible] सर्वे वदावीं

नें नाठवे भोगुनि भोग कांहीं
बाळांस संसार सुकादिकां हीं २१
यों मला सुखचि दुःख न योजी
वासना जन मनीं अशि योजी
भोग जे स्मरति त्यासचि वाटे
संत चालति न या जनवाटे २२
असे संत ते बाळसंतोष जाणा
गडी श्रीमुरारी स्वयें त्या सुजाणा
जरी होत दुःखी सुखी भोगकाळीं
स्मृती त्यां न नित्या सुखाच्या सुकाळीं २३
क्षुधादि बाधा सरतेचि काळीं
सच्चित् सुखाच्या पडती सुकाळीं
ते बाळसंतोष जयां सदा हा
संतोष जो तोष दिशांस दाहा २४
संतोष तो नंद-कुमार साचा
बाळांस तैसा परमा-रसांचा
पंक्तीस दे लाभ अजी वनांत
बुद्धी जयांच्या जगजीवनांत २५
हरी देह तो देहबुद्धीस मानी
मृषा स्नेह वैषम्य तत्वीं समानी

खुजी तेचि जों जों जयाची वदावी
समीपत्व तों तों तयां देव दावी २६
एवंच जों जों जडसाच वाटे
तों तों असें दूरिल याच वाटे
जों जों खुजा हा अभिमान होतो
समीप तों तों हरि ही अहो तो २७
असे कर्णिका अंबुजा-माजि जेवीं
मुलां-मध्य भागीं बसे कृष्ण जेवी
मुखीं ग्रास सप्रेम उल्हास हातीं
दहीं भात हे देव लीला पहाती २८
वंशी नादनटी निळा कटि तटीं खोवूनि मोटीं पटीं
कक्षे वामपुटीं स्वशृंग निकटीं वेताटि ही गोमटी
जेवीं नीरतटीं तरूतळवटीं श्रीराम देहीं उटी
दाटी व्योमघटीं सुरां सुरव लुटी घेती जटी धूर्जटी २९
घे हातीं कवळा मनांत क[illegible]ळा त्या सुंदरा गोवळा
चित्तालागिं वळा स्वसत्त्व निवळा ध्या सांवळा कोंवळा
कीर्त्तिचा ढवळा सुधाब्धि धवळा जो भक्तिचा जांवळा
प्रेमातें [illegible]वळा उठे [illegible]ळवळा त्या प्रीतिनें आंवळा ३०
हरी कर्णिकेच्या स्थळीं मध्यभागीं
मुलें भोंवती ऱ्हस्व दीर्घे विभागी

वामनत्व·

ल्हाना पुढें थोर अंभोजपत्रें
असी बैसवीली [2]भवोकीत पत्रें ३१
वत्स सर्व-शुक भागवतांत
श्रीपती स्वशिशु-भागवतांत
जेविती ह्मणति भागवतांत
स्वात्मता रसवि भागवतांत ३२
वर्णरीति यमकीं समजातें
तेचि कीं विषम कीं सम जातें
शब्द वामन शुभा-नुभवाचे
त्रास ते हरिति भानु भवाचे ३३

हरिविलास

फणि [3]फणांवरि नृत्य करी हरी
प्रकृति जो भव-बंध करी [4]हरी
[+]त्रिभुवनीं जनिं काननिं दीसतो
स्मर मना प्रभु [5]योमिनि दीसतो ३४

१ कमलपत्रें, २ भव-अर्क-आतप-त्र-संसाररूप सूर्याच्या उष्णापासून तारणारा जो कृष्ण तेणें, ३ सर्पाच्या फणेवर, ४ हरणकरी, ५ रात्र दिवस.

+ त्रिभुवनीं जगजीवन दीसतो; असाही पाठ आहे.

त्रिभुवनीं जगजीवन दीसतो
करि कृपा यमुनाख्य नदीस तो
मथुनियां भुजगा अतिकाळ या
दवडुनी खळदुर्मति-काळया
तसदीं करूनियां नमनातें
तत्कथा सुखनिधान मनातें
वाटतें ह्मणुनि वर्णिल वाचा
स्वाद कृष्ण-गुण लेश लवाचा ३
ग्रंथ हा हरिविलास ह्मणावा
प्राकृतांत सहसा न गणावा
गोवळ्यांत हि वसोनि हरी तो
तत्कथा करुनि बंध हरीतो ४
धेनु चारित उभा गवतांत
श्रीहरी ह्मणति भागवतांत
प्राकृतांत हि +असी शुकवाणी
दीसते बरि च कौतुकवाणी ५
आत्मा जगज्जीवन वामनाचा
जो [illegible] नित्य नवा मनाचा
नामामृतें ग्रंथ कलौ करीतो
नामें जना तारक लोकरी तो ६

+असे शुकवाणी; पाहतां बरिच कौतुकवाणी, असाहि पाठ आहे.

सेव्य देव मुनि मानव संतीं
तो वनीं सुखनिधान वसंतीं
क्रीडतां स्वजन संकट वारी
जे पितो सविष दुर्धर वारी ७
ह्मणुनि दंड उदंड भुजंगमा
करुनियां सुख दे स्थिरजंगमां
शुक नृपास वदे चरिता नया
हरि कथा असि भागवतांत या
हा रजे रिति धरी भुजगातें
बाहतो जलजैनाभ जगातें
तो भुजंगम शिरीं नट नाचे
ते विलास परिसा नटनाचे ९
नाचली फणि फणावर साची
कृष्ण मूर्ति नयिं सौ वरसांची
हे कथा कथितसे शुक राया
लोक तीनहि कृतार्थ कराया १०
करी धन्य पायें वना जीवनातें
स्मरारे स्मरा त्या जगज्जीवनातें
विरिंच्यादिकीं मंत्र ज्यांचा जपावा
वनीं वाजवीतो महाराज पावा

जल २ कमलनाभ ३ साह्य

परिसृनि वनिं गाईनाद त्या पांवयाचा
विचरति समजोनी अंतरीं भाव याचा
हरिगुणगण गाती भोंवत्या गोपजाती
श्रवण-पठण-मात्रें ज्याचिया तापजाती १२
एके दिनीं गोप वसंत-तापें
तृषार्त्त मार्तंड-कर-प्रतापें
पुढें वनीं धुंडिति सर्व पाणी
मागूनि ये दूरुनि चक्रपाणी १३
ते पावले नदिस तों ह्रद कालियाचा
जेथें निवास भुजगा अतिकाल याचा
ज्याच्या विषें विषम तें ह्रदनीर भारी
प्याले समीप नसतां मधुकैटभारी १४
धेनु गोपहि तया जलपानें
त्यां विषानळकढे जल पानें
पावले सकल ही मरणातें
अंतरोनि हरिच्या चरणातें १५
पावला झुडुकियांत हरी तो
जो स्वकीय-जन-मृत्यु हरीतो
त्याचिया करिति जे स्मरणातें
होति ते वश कसे मरणातें १६
आ[illegible]विण अनाथ असे जे

१ डोह.

काळनिद्रित धरातळ संजे
त्या कृपेकरुनियां अवलोकी
जन्म मृत्यु हरि जो तिहिंलोकी १७
काळ सर्प विष या न मृतातें
जीववी स्वनयनें अमृतातें
वर्षतां पशुप धेनु अशेषें
ऊठती खडबडूनि विशेषें १८
मग उठूनि परस्पर पाहती
पशुप विस्मित होउनि राहती
विष पिऊनि मरोनि कसे रिती
ह्मणति जीवन हें चि विचारिती १९
जो जगीं स्वजनमृत्यु हरीतो
आठवे अवघियांस हरी तो
जीववी निज कृपा-अवलोकीं
कोण त्याविण दुजा तिहिंलोकीं २०

गोविंदामृतदृष्टि-वृष्टि-करितां आतां मगेनी जितो
कीं चित्तास सचेतना स्मृतिपणें देहादिकां योजितो
जे मेले गरळानळें करुनियां ते ऊठले हें खरें
केलें हें हरिनेंचि या अवघियां देवांचिया शेखरें २१

¹शुप आणि पशू विषजीवनें

१ गोपाळ

मरति त्यांसहि दे हरी जीवने
दवडि तेथुनि दुष्ट-भुजंगमा
परम बाधकं जो स्थिरजंगमा २२
छाया जियेच्या उदकास काळी
केलें तिये शुद्ध तयाचि काळीं
श्रीइंद्रनिळ द्युतिकाळि याची
कृष्णोंचि ते दूषितकाळियाची २३
श्रीकृष्ण काळा यमुनाहि काळी
दडूनि काळाफणि[1] तेचि काळीं
कालिंदिचें जीवन शुद्ध केलें
कथामृताला जग हें भुकेलें २४
तिघां कृष्ण रूपें तिघां कृष्ण वर्णें
तिघां लागी कृष्णाख्य दोंदोंचि वर्णें
पुराणीं वदे श्री शुक श्लोक राया
पुढें ग्रंथविस्तार याचा कराया २५
कृष्णारूपचि जया जग सारें
कृष्णत्यास मग सार असारें
कृष्णवर्णहि तिघांस विशेषीं
कृष्णशब्द अतएव विशेषीं २६
कृष्णनीर यमुना अति कृष्णा

[1] काळिय

तींत कृष्णफणी देखुनि कृष्णा
ये कृपाकरि सुधा यमुनेला
सागराप्रती तिचा यमु नेला २७
सुधासिंधुचा बिंदु हा येककानें
नृपें घेतला वर्णितां श्रीशुकानें
करीतो पुढें प्रश्न राजा मुनीला
स्मरोनी हृदंभोरुहीं[1] मेघनीला २८
कसें मर्दिलें काळयातें स्ववाचा
वदावें ह्मणे पौत्र तो पांडवाचा
अजी श्रीशुकाचार्य तें खोलपाणी
धरी त्यांत सर्पा करा चक्रपाणी २९
युगें बहू त्या उदकाचि माजी
कां लोटलीं सांग भुजंगमा जीं
कृष्णें नयांजीववविलें मृतांतें
पुढें वदावें चरिता मृतातें ३०
अजी कृष्णें कृष्णेमधिल फणि काळा दवडिला
कथेचा जो भाग त्वरितचि तुह्मी हा निवडिला
परंतु श्रीकांतें परम भगवंतें निजमुखें
चरित्रें जीं केलीं अमृत तुमचा वाटति मुखें ३१
रमा-ब्रह्मा-शंभू-त्रिभुवनपती-सेव्य-चरणें

1 हृत्कमळीं

स्वतंत्रें गोपत्वें धरणितरि याचें विचरणें
अजी मानी तृप्ती श्रवण करितां त्यासि कवणें
त्रिलोकीं क्षेमार्थ त्रिभुवनपतीचें मिरवणें ३२

प्रश्न हा परिसतां शुकयोगी
श्रोतयां त्रिभुवनीं उपयोगी
वाटलें सुख बहूत कृपाळा
बोलतो हरि-चरित्र नृपाळा ३३

सांगे कथा शुक भवांबुधितें तराया
कीं काळया-ह्रद असे यमुनेंत राया
जैसें कढेंत कढतें जळ अग्नितापें
तैसें ह्रदोदक-भुजंग-विष-प्रतापें ३४

ऊसळे सळसळां जळ डोहीं
त्यावरी खग शकें न उडोंही
अंतरिक्ष-गत-पक्षि जळोनी
लक्ष लक्ष पडताति गळोनी ३५

काळिया तरि जळांतचि आहे
जाय दूरि गरळानळ आहे
उष्ण-वारि-विष-वायु नभाला
व्यापितां न उडवे शलभाला
व्यापुनी विष असे गगनाशीं ३६

राम्फ़ असाहि पाठ आहे: १ टोल +

त्यामधीं उडनि ते खग नाशी
आगे त्यावरिलिया पवनाची
राव ते करि समीप-वनाचीं. ३७
ऱ्हदीं ज्याजळाचा विषाचा तरंगीं
१फिरे वायु येऊनि तो अंतरंगीं
करी स्पर्श ज्याला तयाचा कणाचा
हरी प्राण तो प्राणियांचा गणाचा ३८
चंड वेग विषविक्रम ज्याचा
शेष-वासुकिचिया अनुजाचा
त्याखळासि खळ-मर्दन पाहे
दंड ही करि तथापि कृपा हे ३९
जीवनांत जगजीवन नाहीं
देखिली असि विषें यमुना ही
दंड जो करिल दुष्ट मतीतें
तोचि केवळ अनुग्रह तीतें ४०
इछिला नदिअनुग्रह राया
यामिसें भुजग-गर्व हराया
थोर येकचि कदंब तटाकीं
त्यावरूनि उडि अच्युत टाकी ४१
जाळणार विष जीवकदंब

१ण, २जळात, ३समुदाय.

जाळवे न तरु तोचि कदंब
त्यावरी अमृतबिंदु गळाला
जाळवे न तरु तोचि खळाला ४२
ने जई विहगराज सुधेतें
पावला गरुड यावसुधेतें
त्या तरूवरि तई बसला हो
घे तई द्रुम सुधारस लाहो ४३
हरि चढोनि तयाच तरूवरी
स्वरशना-वसना सह सांवरी
कसुनि कास कसी कनकां-बरें
दृढ करी कटिसूत्र कटीं बरें ४४
प्रचंड डावा भुजदंड भारी
सव्यें करें वाजवि कंठभारी
गर्जोन वृक्षाचवरी तटाकीं
उडी विषाच्या सलिलांत टाकी ४५
कदे आधी पाणी रथचरणपाणी वरुनियां
उडी टाकी हाके सरसि उदकीं सांवरुनियां
भुजंगाचा डोहो गहन हि अहो तो खळ बळी
वसे जेथें सर्प स्वगृह करुनीयां खळबळी ४६
पाणी धनुःशत उचंबळलें ऱ्हदाचें

१ कमरपट्टा. २ चक्रपाणी.

ज्यामाजि तें विषचि तुंबळ दुर्ह्रदाचें
कल्लोळ लोळ भयकारक ये तटाका
आश्चर्य हें जरि गमेल मनांत टांका ४७
कीं अनंतबल ज्या-प्रबलाचें
काय हो नवल याच-बलाचें
हें चरित्र सुर-मानव-तारी
वर्णिजे ह्मणुनियां अवतारीं ४८
अमृत-हरिविलास श्रीहरी हा विलासे
प्रथम तंव विलासे तोचि म्यां सेविलासे
कथिसि निजचरित्रें तूंनसे वामनाला
श्रम परि सुख देते हेचि सेवा मनाला ४९

अध्याय २

ह्रदीं उडी घालुनियां निघाला
आला खळाच्या सदनास घाला
विलास येथूनि दुजा हरी तो
करी खळाचा मद जो हरी तो
खेळे जळीं त्या खळदंड पाणी

दुष्टह्रदयकालियाचे.

विदारिती श्री भुजदंडपाणी
जळांत हस्ती-हरिविक्रमातें
दावी तसा श्रीहरि विक्रमातें
आफळी ह्रदजळीं भुजदंड
त्रास तो करि खळास उदंड
घोष तो परम-दुःसह मानी
कालिया विषमदें अभिमानी
कर्णहीन नयनीं ध्वनि घेतो
क्रुद्ध होउनि भुजंग निघे तो
देखिला ठवकि जो स्वजळाला
देखतांच ह्रदयांत जळाला
देखिलें नयनिं नंदकुमारा
शामसुंदर वरा सुकुमारा
मद हास्य अतिरम्यसुखाचें
दाखवी स्वसुख नित्य सुखाचें
जें ये न कोणे उपमे-समान
नानातपीं जेथ रमेस मान
श्रीवत्स ऐसा-ह्रदयां-बुजांत
दयार्णवीं एक दयांबु जांत
दशीतेज सौंदर्य पयोधराचें

असें श्रीपदद्वंद्व दामोदराचें
न रूपास ज्या साम्य वेदीं पुराणीं
पहातां पुरेना जयाची शिराणी ७
खेळे जळीं तो खळगर्वहंता
हरावया जी फणिची अहंता
जावीण कोण्ही स्वम्नदा न वारी
तो देखिला येरिति दानवारी ८
देखोनि तो क्रुद्ध फणींद्र झाला
धांवोनियां श्रीगरुडध्वजाला
मर्मस्थळीं दंश करूनि दांतें
दावी बळें विक्रमसंपदा ते ९
स्वसर्पदेहें मग[1] कृष्णजीची
श्रीमूर्ति सत्कीर्ति पवित्र जीची
अनंत-कल्याण-गुणा-वतारी
आछादिली जे भुवनासि तारी १०
लोकरीति जगदीश्वर दावी
ते अपूर्व म्हणऊनि वदावी
हें न जाणत जन व्रजवासी
दुःख शोक करितील जिवासी ११
त्यामाजि जे सन्निध गोप जाती

---

१ कृष्णा.

गाई गुरें दुःखपथासि जाती
तीरीं सभेस्तांसहि कृष्णआधी
झाली वदे श्रींशुक तेंचि आधीं १२
भुजंगें हरी वेष्टिला सर्व देहीं
न हाले न चाले न काहीं वदेही
असें देखती सर्व मूर्छेस जाती
महा दुःख शोकें भयें गोपजाती १३
ज्यां लाभ हा ते प्रियपूर्णकाम
ज्याचा पदीं देहकलत्रकाम
समर्पिलें येरिति त्या अजाला
देखोनि त्यातें बहु शोक झाला १४
मूर्छी विमानीं गगनीं सुरांला
आकांत गाई वृष वासरांला
आक्रंदती मांडिति रूदनातें
देखोनि ऐसें मधुसूदनातें १५
कृष्णाकडे अर्पुनि लोचनातें
भयें पहाती भयमोचनातें
स्वशोक यांला बहु तीव्र झाला
दावी महोत्पात अति व्रजाला १६
उत्पातधाकें यमुनातटातं

कृष्णातें.

त्यावें पाहावें निजसंकटांतीं
व्रजीं अरिष्टें कृष्णाने दावीं
कथा असी येरितिनें वदावी १७
वृत्तांत ऐसा यदुवंशी झाला
तों सूटला त्रास महाव्रजाला
कांपे धरा वर्षति तीव्र तारा
देखोनि गावांत निघे न वारा १८
बहु अकाळविजा पडती क्षिती
रुपति लोचन ते भय लक्षिती
अतिसमीप अनर्थ गमे मना
हरि असो रुखि हे मनकामना १९
नभीं उल्कापात क्षितिवरिहि उत्पात दिसती
हरी कोठें आहे म्हणुनि जन अन्योन्य पुसती
हरी गेला राना त्यजुनि बळरामास सदनीं
असें हें जाणोनी वदति अतिदुःखाब्द वदनीं २०
न बळराम हि आजि अजी वनीं
म्हणुनि निश्चय कृष्ण अजीवनीं
करिति धैर्यहि जाय जळोनियां
प्रभुमहत्व तया नकळोनियां २१
हरी चित्त वित्त प्रियप्राण ज्यांचा

अद्भुतचिन्ह. * निघालेलीज्वाळ

न सोसे वियोगाग्नि पादांबुजांचा
न उल्लंघवे दुःखशोकार्णवातें
उडे धैर्य जैसीं तृणें जीर्ण वातें २२
हरीचां वियोगाचि सीमा न साहे
व्यथा प्राप्तसर्वांचिया मानसा हे
वियोगानळें जाळिता काळजाला
जगाच्या लयाचा गमे काळ झाला २३
धरूनी मनीं सर्व या काळजीला
निघाले पहायास गोपाळजीला
सवें चालिली बाळ-वृध्धादि-सेना
हरीवीण जीवित्व कोणा दिसेना २४
परम वृध्द बहू लवले कटीं
धरुनि येष्टि करीं आतें कटीं
त्वरित चालति बाळहि रांगती
हरिच ज्यां स्वपथीं सकळां गती २५
ज्यांसि नित्य हरिदर्शन वोढा
चालिल्या तरुण आणि नवोढा
अंतरीं धरुनि दैत्यजनारी
चालिल्या वडिलही व्रजनारी २६
स्वयें काळ जो मृत्युकाळादिकां ही

काठी.

असे त्रास त्या श्रीहरीलागिं काहीं
असें राम जाणूनि त्यांनें निर्धारी
म्हणे यांस नेतो स्वयें दंनवारीं २७
जाणोनियां येरिति कृष्णभावा
जो जाणताहे अनुजप्रभावा
ह्मणे हरी प्रेरुनि ने जयांला
मी कां निवारूं सकळां तयांला २८
दुःख तें [illegible]रूनि तीव्र जिवासी
चालिले सकळही व्रजवासी
रज्जु कृष्ण भवसर्प हरीतो
धुंडिती सकळ गोप हरी तो २९
चैतन्यरज्जुभुजग स्थिरजंगमाचा
त्यालागि आवरेण देह भुजंगमाचा
गोपाळ धुंडिति तया निजदेवराया
साकार जो चरण त्यांसहि दे वराया ३०
म्हणुनि शुक ह्मणे कीं आइकें गा नृपाळा
पशुप निगमरीती धुंडिती त्या कृपाळा
हरिचरणरजातें लक्षनी गोपजाती
सकळहि यमुनेच्या जे तटाकास जाती ३१
स्मरवर धरि माथां त्रांबुही अंबु जाचें

कृष्णाच्यासामर्थ्यास, २ वेष्टण, ३ वेदांप्रमाणें, ४ उदक.

क्षितिस विभव ज्यांचा दिव्यपादांबुजांचे
धरणिवरि तयांच्या लक्षितां लक्षणांचे
परि न कळिति कोठें ते स्मरील क्षणातें
जलज[1] वज्र यवांकुश देखिले
ध्वज मनोहर सुंदर रेखिले
उमगलीं धरणीतळमंडनें
हरिपदांबुरुहें भवखंडणें ३३
अमित-गोष्पद-अंकित-वाट ते
श्रु[redacted] जी मज वाटते
श्रुतिपथीं हरिचे पद धुंडणें
तसिं पदें प्रभुचीं कवि-मंडणें ३४
गोशब्द येणें श्रुति सूचवीतो
दावी रसीं श्रीशुक जी चवी तो
जे गोपदीं पाय रमापतीचे
सद्रूप ते अर्थ तया श्रुतीचे ३५
असा तो गोमार्ग श्रुतिपथ जसे कां निगम ते
अनात्मत्वत्यागें वदति निज जे वस्तु गमते
तसे[+] गोपाळांघ्री त्यजुनि नयनीं विश्वगुरूचीं
पदें तीं पाहाती स्वजन मनिच्या कल्पतरूचीं ३६
आत्मता कथुनि ही प्रति कोशीं

---

१ कमळ, २ वेदमार्गतुल्य.
+ तसे गोपाळांचे त्यजुनि पद जे विश्वगुरूचीं, असा हि एक पाठ आहे.

पेरकोश दुसरा उपदेशी
ब्रम्हपुछ ह्मणते श्रुति जेथें
आत्मता निखिल केवळ तेथें ३७
ब्रम्ह तें म्हणति जें श्रुति पुछ
ज्ञान मात्र जड जावरि तुछ
रज्जुही वरि मृषा फणि जैसा
काळिया हरितनूवरि तैसा ३८
अहो पुछ तें काळियानें स्वपुछें
दिसेना असें वेष्टिलें तत्व तुछें
असे त्या भुजंगामधें हार जैसा
हरी काळियाच्या शरीरांत तैसा ३९
भुजंगें असें वेष्टिलें त्याहरीतें
अविद्यादिकां ज्ञान जाचें हरीतें
करी कर्म तो लोक ऐसें करीती
पुढें दावितो येथुनी लोकरीती ४०
पावले न[illegible] ब्रजवासी
सर्वही धरुनि तीव्र जंवासी
रज्जू जो भवभुजंग हरी तो
देखिला भुजगबंध हरी तो ४१
भुजगवेष्टितकृष्ण कळेवरी

वेगास•

पुरुषचेष्टित ही न कळे वरी
दुरुनि देखति लोक समस्त कीं
उरगबंधन आनत मस्तकीं ४२
नदीतटीं मूर्छित गोप सारे
राया हरी देखियला असा रे
आक्रंदती वत्स गुरें तटाकीं
नेत्रोदकें तो पशुवृंद टाकी ४३
असा देखतां कृष्ण गोपाळ गायी
अहाहा अहाहा अगाई अगाई
स्त्रिया बोलती सर्वही कष्ट भारी
करीती हृदीं लक्षिती केठभारी ४४
मृतपतीसह जेविं पतिव्रता
स्वमरणीं स[illegible]कांसहि तीव्रता
हरिविणें [illegible]णतो न जिणें बरें
मरण येसमयीं गुळखोबरें ४५
स्वदेह कृष्णाचपुढें पडो हा
जे ते म्हणे देखुनि पापडोहा
बुडावया धांवति एकवेळा
तो राम त्यासिंधुसि होय वेळा ४६
बेळ तयांसि ह्मणे तुम्हि आयका

१ बळराम.

सकळ गोवळ गोळंणि बायका
भय कदापि न या व्रज-नायका
असुख कोण करी सुखदायका ४७

अशा रामशब्दासि घेवूनि कानीं
यशोदादिसं...आगोपिकानीं
दिल्हे प्राण नाहीं तया बायकांहीं.
गमे धैर्य त्या रामवाक्येंचि कांहीं ४८

नंदादिकां सर्वहि गौळियांला
त्या रामवाक्येंच करूनि यांला
विश्वास कांहीं हृदयांत झाला
ते पाहती सर्व बळानुजाला ४९

गोपिका हरिपदीं अनुरक्ता
त्याविणें त्रिभुवनांत विरक्ता
सर्प वेष्टित-अचेष्टित-कांता
देखतां रडति त्या व्रजकांता ५०

हरिसवें रमल्या दिनया-मिनी
वदति तेंचि परस्पर कामिनी
नयनिं नीर-कथा-रस आननीं
बसलिया यमुना-तट-काननीं ५१

यशोदेसवें बैसल्या गोपजाया

---

१ बळ-अनुज – बळरामाचा कनिष्ठ बंधु.

हरीकारणें सिध्ध देह त्यजाया
यशोदेस त्यांस व्यथा तसमान।
शवांच्या जशा पूतळ्या वर्तमाना
देखोनि डोहीं व्रज गोप-पाला
हाणोनि घेती युवती कपाला
भूमीवरी हाणिति मस्तकांहीं
हरीविणें शून्य समस्त कांहीं
स्वशोक सर्वांसहि तीव्र जाची
देखे व्यथा हेचि अति व्रजाची
पुरे करी येथूनि लोक-लीला
निर्दोळिती जे श्रवणें कलीला
कष्टी स्वगोकुल असे स्वनिमित्त भारी
स्त्री बाल वृध्द पशु देखुनि कैटभारी
राहे मुहूर्त-भरि आणिक लोकरीती
पाहे स्वहेतु जन शोक कसा करीती
निरूपिलें जेरिति या प्रबंधीं
मुहूर्त राहोनि भुजंग-बंधीं
बंधातुनी शीघ्र निघे हरी तो
जो बंध लोकीं अवघे हरीतो
स्वतनु फुगवि कांहीं बंधनीं कैटभारी

१रचनत

नट नट करि त्याचा देह ते कष्ट भारी
त्वरित उकलि वेढे सर्प कांपे थरारी
झडकरि फणि-बधा-बाहेरी ये मुरारी ५७
क्षणभरी जरि देह न सूटता
तरतटां स्थळिंच्या स्थळिं तूटता
बळ असें कळलें खल-सत्तमा
दुरुनि लक्षितसे पुरुषोत्तमा ५८
डोळे विशाल अतिवर्तुळ काप-नापें
जे स्तब्ध रक्त बहु-उष्ण विष-प्रतापें
दृष्टांत दे शुकहि मंडुक-भोजनाचे
तैसेच नेत्र अतिदारुण दुर्जनाचे ५९
झाली व्यथा बहुत कोप मनीं न थारे
नासो-पुटीं निघति दारुण उष्ण वारे
श्वासासवें वमतसे गरला-कराळा
पाण्यावरी हरिस लक्षितसे निराळा ६०
फणि-फणा-वरती व्रजराज तो
प्रकरणीं पुढिल्याच विराजतो
करील दंड उदंड भुजंगमा
निज-सुख-प्रद जो स्थिरजंगमा ६१
हा लोकरीतीच विलास देवें

नाकपुडींत

केला शुकें दाखविला सदेवें
जो रज्जु-सर्पा स्थिर-जंगमाचा
वेष्टी तया देह भुजंगमाचा ६२

ह्मणुनि हरिविलासीं लोक-लीला-विलास
त्रिभुवनपति तूझा कीं असा भाविलास
पद-युग फणिमाथां जें जगद्धाम नाचे
सुखकर करुं लोकीं शब्द हे वामनाचे ६३

अध्याय ३

आता शुकाचार्य ह्मणे नृपा हे
दंडप्रसंगांत कृष्णचि पाहे
कीं पादपद्मे जगदीश्वरानें
तो मर्दिला सर्प रमा-वरानें
क्रुद्ध तो ह्रदजळीं परमे-शा
लक्षितो दुरुनि साप रमेशा
त्या-खळा-फणिसही हरि पाहे
ते कथा परिस दिव्य नृपा हे
थोर वेग वदनीं रसनांचे

दुर्विषें प्रतिमुखीं रस भाचे
दंत आंत शिशु भूमिधराचें
प्रांत चाटित असे अधरांचे ३
ज्याच्या विषाचे उदकीं चपेटे
वनाग्नि ज्याच्या नयनेंच पेटे
देखे असा गर्व भुजंगमाचा
निर्नाणकर्त्या स्थिर-जंगमाचा ४
जवळि खेळत खेळत पातला
झडप घालुनियां कर घातला
गरगरां धरुनी भ्रमवी नभीं
गरुड सर्प जसा धरितो नभी ५
अहो तोही पाहे अवसर डसायास हरिला
परंतु श्रीकृष्णें भ्रमण करितां गर्व हरिला
शरीरीं फांसोळ्या बहु खुळखुळ्या होउनि ढिल्या
गती तत्प्राणाच्या सकळहि गळ्यामाजि चढल्या ६
नासिलें भ्रमवितांचि बळातें
क्षीण देखुनि खला-प्रबळातें
शेपुटी धरी अधोमुख हातीं
कौतुकें स्वजन सर्व पहाती ७
समयहा सत्व अलक्ष यातें

नेलें तरी-देहबळ क्षयानें
निःसत्व मानी फणि आपणानें
तरीं बळें तो उचली फणानें
अधोमुख श्रीहरि साप दानीं
धरी जसा गोप-स्त्रिया पदानीं
डसावया जों मुख सांवरीतो
वेगें हरीनें सहसा वरी तो
मुरडुनि नरडी करें दुजानें
धरुनि असें धरिलेंच पुछ ज्यानें
रगडुनि फणि-कंठ कैट भारी
उपरि-चढे करि नाट्य नीट भारी
फणावरी सारथि पांडवांचा
आरंभ मांडी मग तांडवाचा
पादांबुजीं देव-शिखामणी-च्या
फणीचिया दीप्तिशिखा मणी-च्या
उदक चंचल चंचल त्या फणा
फिरवितो फणि जेरिति गोफणा
चपळ नृत्य करी वरि मोकळा
सफळ जाकरितां सकळा कळा
जो प्रवर्तक-विलास कळांचा

देवशिरोमणि, २ कांतीच्या ज्वाला. + अर्जुनाचा

जो कलाप्रद कला सकलाचा
जे शिवादिक गुरू नटनाचे
त्यांसि आदिगुरु तो नट नाचे १३
जो रची अघटिताघटनातें
तो करी फणिवरी नटनातें
काय विस्मय विलासमयाचा[1]
हा कथारस नया समयाचा १४
चपळ तो पळतो उदकावरी
उफलतो खलतो हरि आवरी
कुलपती लपती फणि ते किती
भुजगती जगती तळ टांकिती १५
आरंभल्या ऊपरि नृत्य काय
तेथें करी कौतुक विश्वकाय[2]
देवीं कसा श्रीहरि पूजिला हो
श्रोत्यांसही ऊपरि तोचि लाहो १६
विमानीहुनी वृंद वृंदारकांचे[3]
नभीं मल्लिका कुंद मंदारकांचे
फुलांचे समूह स्वनाथावरी ते
बहू वर्षती जासि लक्ष्मी वरीते १७
आणूनि नानाविध-पूजनाचे

---

१ विलासमय-विलासरूपी, २ विश्वरूपी, ३ देवांचें.

हृदांत जेथें सुरराज नाचे
ते पूजिती त्या पुरुषो[illegible]मातें
जो पूज्य सर्वा-सुरसत्तमातें १८
पूजूनि पुष्पादि-अनेकरीतीं
स्तोत्रें विचित्रें नमनें करीती
सुवा[illegible] सुर गीत नाना
गंधर्व गाती करिती तनाना १९
समूह गाती विबुधांगनाचे
श्रीरंग मध्यें विविधांगे नाचे
सुरस्त्रियांचे ध्वनि टाळियांचे
मर्दी असे हो फणि-काळियाचे २०
मृदंग एकी कितिएक वीणा
संगीत-विद्या-कुशल-प्रवीणा
नाचोनि मर्दी हरि काळियातें
त्या वाजवीती करताल यातें २१
तुडवि काळिय-मौळि समस्त कीं
म्हणि चुकोसि उरे शतमस्तकीं
प्रतिशिरांतुनि ही मद नाशितो
हर अनंग करीमदनासितो २२
तयामाजि ज्या मस्तकीं तो लवेना

१ देवस्त्रियांचे, २ नऱ्हेतऱ्हेचें अंगकौशल्य करणारा, ३ अंगरहित.

पुन्हा त्यास मर्दी जसा हालवेना
करूनी असा नाच देवें नटांचा
फणी मर्दिला हाणहाणोनि टांचा २३
मुखांतुनी शोणित फार वाहे
+होऊनियां मूर्छित राहताहे
ऐशाप्रकारें खळगर्व-हंता
हेरी[1] तयाची सगळी अहंता २४
शतां-शिरांमाजिहि जें लवेना
मर्दी तयातें मग हालवेना
होतांचि चेंदा अवयें अहीनें
आच्छादिलें मस्तक सत्व-हीनें २५
निजेला मूर्छेनें भुजगपति तो मृत्युशयनीं
मुखें रक्तें वोकी तरळगरळा क्रूरनयनीं
शतांमध्यें जें जें शिर उंचलि निश्वास-सहित
प्रभू तें तें मर्दी निजपद तळें अव्यैबहित[2] २६
शिरें पदाऊपरि सत्वहीनें .
जाणो फुलें अर्पियेलीं अहीनें
केला असा तो फणि नम्र देवें
हरूनि त्याचा मद वासुदेवें २७
राहिल्या सकळही चपळाया

[1] हरण करी, [2] स्वस्छचित्तानें,   + मूर्छाभरेंनस्मृतिवारवाहे- असाहि पाठ आहे

यत्नही न करवेचि पळाया
गर्व सर्व हरिला भुजगाचा
आठवे मग गुरू त्रिजगाचा २८

फणाछत्रें ऐसीं विकळ हरिनें जीं तुडविलीं
मुखें रक्तें धैर्यें सकळहि मनाचीं उडविलीं
स्वचित्तें तो सर्प स्थिर चर-गुरूनेंचि शरण
+कळोनीयां गेला न कळति शिरीं तेचि चरण २९

नारायणा आठवि सर्पराणा
पावे ह्मणे गा पुरुषा पुराणा
स्वयें शिरीं तोचि असें कळेना
वेदांसि ज्याचें पद आकळेना ३०

धरुनियां उदरीं स्थिरजंगमा
तुडवितां बहु कष्ट भुजंगमा
मग नितंबिनि त्या भुजगाचिया
शरण येति पित्यास जगाचिया ३१

नागिणीच परि मानवनारी
कामरूप धरि तो पवनारी
होवुनी मनुजरूप रमावें
त्या स्त्रियांसह असें करमावें ३२

कृष्ण हा त्रिभुवनेश्वर साचा

१-सर्प. + स्मरोनीयां - असाहि पाठ आहे.

हा निजाऽत्म-रस सर्वरसाचा
हें कळोनि शरणा चरणातें
आलिया स्तविति आचरणातें ३३
श्रीअनंत विविधां अवतारीं
जो कथा करुनि केशव तारी
तोचि धन्य करि या भुवनातें
वेद गर्जति अशा-स्तवनातें ३४
देवांचिया या स्तवनासि कानीं
घेवूनियां नागिणि-वायकानीं
श्रीकांत नारायण हाचि यातें
केलें तिहीं हो दृढ-निश्चयातें ३५
ऐकोनि गातां सुरगायकानीं
कानीं वरें नागिणि-वायकानीं
सर्वेश हा सर्व-समान साचा
केला असा निश्चय मानसाचा ३६
शरण त्या रिघती समजोनियां
न फणि-मूर्छित मूढ निजोनियां
न सुरगायन तें श्रवणीं पडे.
न हरि हा ह्मणुनी स्मृति सांपडे ३७
परि शरणागत याचि वासुदेवा

भुजगहि तो स्वमनेंचि देवदेवा
जरि शरण तया तरी अहाहा
कवण ह्मणे मज पीडितो महा हा
हरिस जो स्मरतो मनिं कालिया
शरण सुंदरि त्यासचि आलिया
परि परोक्ष भजे फणिराज तो
भुजगियां अपरोक्ष विराजतो ३९
हुडकितां निज रज्जु हि साप तो
गमतसे ह्मणऊनि च कांपतो
हरिचि पहातसे मनिं वाट तो
हरिच तो शिरिं अंतक वाटतो ४०
न सर्प हा रज्जु ह्मणोनि ठावें
त्याचे मनीं तें भय कां उठावें
जो कां भितो मानुनि सर्प साचा
तो त्रास त्याचा हरि मानसाचा ४१
अजि जयां अपरोक्ष दिसे हरी
इतर-दुःखहि तद्वचनें हरी
हरिसि जाणति नागिणि जाणत्या
ह्मणुनि सोडविती पति जाण त्या ४२
शुकहि सूचवि हेचि कथा रसीं

---

१ अप्रत्यक्ष-मनातुनि.

न वदतां स्फुट वैखरि फारसी
प्रकरणीं पुढिल्या ब्रज-नायका
स्तविति सादर तें स्तुति आयका ४३
जो का सखा सारथि पांडवाचा
विलास ऐसा करि तांडवाचा
जो नाट्य नामास कलौ करीतो
हा मृत्यु जन्मांतक लौकरी तो ४४
कृष्ण-तांडवविलास ह्मणावा
हा तृतीय ह्मणऊनि गणावा
अर्पिला हरिचिया पदपद्मा
जापदीं त्रिभुवनेश्वरि पद्मा ४५

अध्याय ४

भुजंगासि देखोनि कैशा प्रकारें
भुजंग-स्त्रिया कोणकोण्या-प्रकारें
कशा प्रार्थिती सर्वही श्रीशुकानें
असें वर्णिलें आयका जी सुकानें
धरूनि पोटीं स्थिरजंगमातें

मर्दी असा कृष्ण भुजंगमातें
छत्रें फणांचीं अतिकष्ट भारी
ते पावती आवरि कैटभारी
नाच नाचत असोनि नटाचा
ह्मणतो सरसि-जा-नन टांचा
हानि यास्तव भुजंग-बलाची
दृष्टि त्यावरि पडे अबलांची
पति-भयें अति-विव्हल झालिया
शरण कृष्णपदा मनि आलिया
स्मृति नुरे कबरांबर भूषणीं
मन समर्पियलें व्रज-भूषणीं
स्तन मुखीं धरुनी पिति लेंकुरें
हरिस दाविति त्यां युवती करें
हृदयिं भाविति कीं व्रजपालकें
न वधिजे फणि देखुनि बालकें
पसरुनी युवती वसनाचला
करतळीं अबला अति-चंचला
हरिस काकुलती करिती जलीं
किति अशा किति एक कृतांजली

. सरसिज-आनन- कमळाप्रमाणें मुखजाचें असा कृष्ण, २ कबर-अंबर-भूषणीं-केशबंधन-वस्त्र-भूषणाचा ठायीं, ३ व्रजाचा भूषणरूप कृष्णाच्या ठायीं, + नाश.

श्रीहरीस करिती नमनातें
सत्पदीं करुनि लीन-मनातें
अर्पिती पति-फणां-सुमनातें
प्रार्थिती भुजग-संयमनातें.
हरिपदीं पतिमोक्षणे-तीव्रता
मनिं जयां अतिधन्य-पतिव्रता
भुजग दुष्ट असो जरि कां पती
स्वगुरुदेव तदर्थंचि कांपती
अभय मागति रक्षिल त्या जना
धरुनि निश्चय हा भवभंजना
शरण येउनियां कमलालया
स्तविति त्या करुणा-वरुणालया
हरीची स्तुती नागपत्न्या करीती
अलोकप्रकारांत ही लोकरीती
बहू गोड हे श्लोक जे एकवीस
स्फुरे अर्थ गंभीर जेथें कवीस
दंड योग्य फणि हा खळ साच
श्लोक येरिति निवेदि तसाच
श्लोक त्यावरि दहा नमनाचे

सर्पाचें मर्दन करणारा जो त्यास, २ पति मुक्त होण्याविषयीं त्वरा, ३ संसार नाशकाल करुणेचा सागरास.

श्रोतया सुखनिधान मनाचें ११
श्लोक पांच करुणा उपजाया
त्या निवेदिति भुजंगम-जाया
न्याय दंड ह्मणुनीच वदोनी
श्लोक हे प्रथम त्यांतचि दोनी १२
नव्हे हा अन्याय त्रिभुवन-गुरूचा तिहिं जगीं
गमे न्याय स्वामी करिसि जितुका दंड भुजगीं
अशा या दंडाया धरिसि अवतार त्रिजगती
कृपेने ताराया तव चरण जाला निज-गती १३
दंडही करुनि दुष्ट-खळांसी
वर्तणें सम तुसीं सकळांसी
गर्व नासुनि हि तें पद देसी
देसि जें गुरुपणें उपदेसी १४
ढाउकेंचि पुरुषां वनितांतें
कीं सुतासहि रडाउनि तातें
दंडही करुनि ते शिकवीजे
नीति सांगति जनास कवी जे १५
दंड ही करुनि देव रिपूतें
आयुधें परम त्यावरि पूतें
ह्मणतांच भवबंध हरीतो

१ स्त्रियाला, २ पवित्राने.

तूं अशेष-जन-बंधु हरी तो १६
दासांसि दास्येंचि खळांसिं दंडें
तूं मुक्ति देतोसि अंसी उदंडें
कर्में तुझीं त्यांत विवेकरीती
देसी फलें जेविं जगीं करीती १७
एवं अनुग्रह खळां जरि निग्रहांत[1]
येना तरी विषमता नच विग्रहांत[2]
कर्मानुरूप-फल दंड करूनि देसी
रघांसही गति भल्यांस हिनांघ्रदेशीं १८
सहज पूर्णकृपानिधि जो हरी
खलमद प्रभु दंडमिसें हरी
म्हणुनि बोलति कीं तदनुग्रह
खपनि-दुर्मद-नाशक-निग्रह १९
दुष्टांसही दंड अनेकरीती
जें[+] होम पूजा न जगीं करीती
हस्तें तुझ्या दंड अनन्य ज्याला
मेला तरी धन्यचि धन्य झाला २०
स्वामि जो सविधि-शंभु[3]जगाचा
तोचि दंड कर या भुजगाचा

१ दंडांत २ देहांत, ३ ब्रह्मदेवांसहित शंकर आणि सर्व जगाचा.
+ श्री सूर्यपुत्रादिक जें करीती. असा हि पाठ आहे.

वासना दुरित-दंड करीती
त्यांस नाश तव दंडक-रीती २१
प्रत्यक्षंही दिसतसे खल-सर्प-काय
हा दोषमात्र हरिसीं म्हणवेल काय
जें पाप संचित पुढें क्रियमाण दोहीं
फासूनि आजि सुटला न शके वदों ही २२
एवं तुझा क्रोधहि वर्ज नाहीं
कोपें कृपा हे खलदुर्जनां ही
दुष्टांसही दंड तुझाच हस्तीं
त्या निग्रहीं संत कृपा पहाती २३
जो अन्य-घातास सदां भुकेला
स्वयेंच तैशासहि दंड केला
+कोण्या-तपें हें न कळेचि देवा
आतां असें नार्थिन वासुदेवा २४
अजि किती तपला न कळे तपें
विविध सोसुनियां हिम आतपें
गुरुकुळीं [१]अथवा प्रथमाश्रमें
बहुत जन्म वनीं कमले श्रमें २५
⁂त्यजुनियां अथवा अजि मीपणा

---

१ ब्रह्मचर्यानें.   + कोण्या तपाचें फळ वासुदेवा नेणों असें बोलति देवदेवा असाहि पाठ आहे.   ⁂ त्यजुनिमान धनादिक मीपणा. असाहि पाठ आहे.

नं धन मान अपक्षुनि आपणा
बहुत देउनि मान धनें जना
परम तत्पर या तव पूजना २६

किंवा तुनें लक्षुनि सर्व-भूतीं
केली दया कीं हरिच्या विभूतीं
धर्में अशा श्रीहरि तुष्ट लाहे
तरीच हा लाभ यथेष्ट लाहे २७

जो तूं स्वयें जीवन सर्वभूतीं
तो दाविसी यासि कृपा-विभूतीं
हा लाभ जी भूतदयेविना हीं
लाधेल कोण्ही घडणार नाहीं २८

जीव तूं हरि जगा सकलांचा
दंड आपण चिं होसि खलांचा
सर्वभूत करुणेविण हाता
हें न ये फल कदापि पहातां २९

स्वयें करूनी बहुतांसि दंड
निःपाप केले त्रिजगीं उदंड
त्यांहूनि याचें बहु-भाग्य देवा
अशांत असें प्रार्थित वासुदेवा ३०

देवां न हा लाभ न दानवांला

दैत्यांस. + स्वपर टाकुनि केवल आपणा. असाहि पाठ आहे. ＊ ह्मणूनियां प्रार्थिति वासुदेवा. असाहि पाठ आहे.

ब्रह्मादिकां वा मुनि-मानवांला
कोण्या तपाचा महिमा कळेना
भाग्यास या हेतुचि आकळेना ३१

तपति देव मुनिंद्र समस्त कीं
चरण-रेणु पडो निज-मस्तकीं
रज अलभ्य तुझें स्थिरजंगमा
तदपि लभ्य शिरींच भुजंगमा ३२

शिरिं जयास्तव रेणु असा पडे
सुकृत हें न मनासहि सांपडे
पद-रजासहि या अति दुर्लभा
भुजग पात्र कसा व्रज-वल्लभा ३३

कमलजा[1] तुझि जे निज-नायका
तिसहि लाभ न हा व्रज-नायका
बहु तपें करितां जग-माउली
विनटली[2] मग या नव पाउलीं ३४

त्यजुनि[*] काम बहू करितां तपें
विविध सोसुनियां हिम[3]-आतपें
तुझि निजात्मक-भक्तिच साधली
चरण-रेणु रमा मग लाधली ३५

---

१ लक्ष्मी, २ लिन झाली, ३ शीतोष्ण, * बहुत काम अकाम करी तपें विविध सोसुनियां हिम आतपें मग निजात्मक-भक्तिहि साधली चरण-रेणु रमा मग लाधली असाहि पाठ आहे.

अजित तूं मथिसी करुणालया
वरि तुतेंचि रमा करुणालयां
हरिदिनादि महाव्रत-नीव्रता
करुनि पावलि जी तुज सुव्रता ३६
चपल जे पळ जेविं युगें-करीं
विरमली रमली धरितां करीं
तव रजीं वर जीं चल-लक्षणें
गवसते वसते इतरीं-क्षणें ३७
व्रजपती जप नीरस तुझा सदां
न मनिं ते मनिं तेज दुजें कदां
निरस कळा सकळा तुज अर्पणें
चपल तें पलतें अजि या-गुणें ३८
तव रमा-वर मागुनि जा रजीं
विनटली नटली बहु फार जी
अजितसा जित-सापहि साधिला
विभव हें भवहेलन लाधला ३९
पाहिजे चरण-रेणु जयाला
यत्न ते इतर सिधि जयाला
सर्वथा न करितीच रमेशा
यावरी वदति हे परमेशा ५१

सागरास, २ एका दश्यादि, * सांपडे. असाहि पाठ आहे.

चरणरेणु जिहीं शरणागतीं
वरियला त्यजिल्या सकळा गती
क्षिति न इच्छिति सागर[1]-मेखळा
सुख रसातळ राज्यहि शृंखला ५१
तव पदा जरि त्यांस हि मागती
इतर त्यांस तृणाच-समा गती
न सुरराज्य-सुखादिक-वासना
न मनिं इच्छिति पद्मभवासना[2] ५२
चरणरेणुस या शरणागती
करिति तं अजरा-मरणा गती
इतर सिद्धिहि योगकळांचिया
न मनिं इच्छिति ते सकळांचिया ५३
उरगुणें भव:काम-जटा किती
सकळ केवल मुक्ति हि टाकिती
त्यजिति सर्वहि सार असार जीं
धरिति एकचि भाव असा रजीं ५४
असें तुझें जे पदरेणु देवा
ते साधला हा खल वासुदेवा
आश्चर्य हें मानुनि सर्व रोमा
निवेदिती विश्वमनो-भिरामा ५५

---

१ समुद्र वलयांकित, २ ब्रह्मदेवाचें आसन, ३ सर्पस्त्रिया.

चरणरेणु असे पुरुषोत्तमा
दिसति लभ्य अशुभ खलसत्तमा
विभव लभ्य अशांस अशेष ही
किति ह्मणूनि निरूपिल शेष ही ४६
सदा क्रूर दुर्बुद्धि या कालियाची
तमामाजि उत्पत्तिज्या कालियाची
कळेना तुझा भाव कीं कां खळाला
दिल्हा लाभ हा थोर उत्संखळाला ४७
पाद-तोय पति शंभु जगाचा
मस्तकीं धरि तुर्या भुजगाचा
मौलि-वृंदहि तया चरणानें
मर्दिला अमृत-आचरणानें ४८
इच्छितांचि तव पादरजाला
मानितांसि परमादर झाला
दाखऊनि अमिता विभवाला
नाशिसी अजि अनादि भवाला ४९
माथां धरायास तशा-रजाला
आश्चर्य कीं पात्र भुजंगमाला
कर्त्तव्य तुझें सहसा कळेना
ब्रह्मादि-देवांसहि आकळेना

ऐश्वर्य, २ तमोगुणामध्यें, ३ अपरिमित.

सर्पावरी विश्व-निधान नाचे
हे शब्द त्यांच्या वनिताननांचे
कर्णी विलासें परिसे हरी तो
प्रसभ-दुखें प्रभु जो हरीतो
पदरज-महिमा भुजंगरामा
विनविति तुज रमा-मनो-भिरामा
पदरज-महिमाख्य हा विलास
त्रिभुवननाथ रचूनि सेविलास ५२

अध्याय ५

कृपा हे तुझी दंडशब्दा न साहे
असे वर्णिले मूळिंचे श्लोक सो हे
भुजंग-स्त्रिया भाग्य गाती पतीचें
दयाळुत्व वर्णूनियां श्रीपतीचें
पतीचा शिरीं जो निजानंद नाचे
दहा-श्लोक त्या-देवकी-नंदनाचे
सुखीं वर्णिती श्रीपदां-भो-रुहातें

१ सर्पाचा, २ स्त्रियांचा मुखाचें, ३ साह्या, ४ श्री-पद-अंभस्-रुह्-लक्ष्मीचे स्थान रूप प्र दकमळातें.

करीती नमस्कार रंभोरु[1] ह्यातें
तुज वंदन असो भगवंता
तूं पुरा स्थिर चराचर अनंता
भूषणीं कनक जेंवि भूतीं
तूंच कीं सकळ भूत-विभूती
परब्रह्म जें शुद्ध तें तूंचि देवा
समस्तांचिया आत्मया वासुदेवा
असंख्यातशक्ती कुणाही न मोजी
*तयाचा तयाः नमोजी नमोजी
अनंतशक्ती प्रभु वासुदेवा
तूं ज्ञान विज्ञान निधान देवा
तूं ब्रह्म तूं निर्गुण निर्विकार
तूं तत्त्वतां न प्रकृति[2]-विकार
महाकाळ तूं जो गिळी काळ सारे
दिसे तूजमध्यें दुजा काळसा रे
निमेषादि-कालास जो पाहताहे
गिळूनी तया शेवटीं राहताहे
निमेषादिकां काळ जो शक्तिरूपी
उठे लीन ही होय तुझ्या स्वरूपीं
तया साक्षि तूं पाहासी पद्मनाभ

---

१ रंभा—उरु—कदळीप्रमाणें ज्याच्या मांड्या अशा सर्पालिंग. २ मायाकृत विकार घा नव. * तुझ्या स्वाधि तूतें नमोजी नमोजी. असाहि पा. आहे

स्वयें जुग्व्यतां काळ तूं काळनाभ ७
नमों काळरूपा नमो विश्वरूपा
नमो विश्वसाक्षी-अनादि-स्वरूपा
नमो विश्वकर्त्या जगत्कारणाला
स्वयें कारणातीत-नारायणाला ८
तूं ईश येरिति उपाधि जयासि विद्या
तूं जीव ही धरुनि ही असती अविद्या
जो स्वानुभूति-रहित-त्रिगुणा-भिमान
त्यातें नमो स्थिर चरांनहि जो समान
सिध्दांतरूपें नमनें करूनी
तदन्य जे वाद तयां हरूनी
सत्शास्त्र-सिध्दांत पुनः वदोनी
त्या वंदिती श्लोक असेच दोनी १०
नमो अनंतास अतींद्रियास
कूटस्थ जो केवळ तूं तयास
सर्वज्ञता शेषहि तो न मोजी
जाची तया तूज नमो नमोजी ११
उपासना धन्य असे रितीची
तुझी करीती कमलापतीची
यथारुची जे भजताति ऐसा

---

१ ज्ञानोपाधि, २ अज्ञानोपधि, ३ आत्मानुभवानें वेगळा आहे सत्वादिगुणत्रयाला अभिमान ज्याचा, ४ स्थावर जंगमांतें.

त्यांतें तसा भासशि वासुदेवा
जसे वर्णिती अंध बैसोनि हस्ती
धरूनी तदंगास ही स्वस्वहस्तीं
तुतें वर्णिती अज्ञ जे आत्मकारें
तयां वाटसी तू तसा त्या विकारें
जया सांपडे हस्तिचा पाय हस्ती
वदे तो स्वयें स्तंभरूपीच हस्ती
जया सांपडे कान तो शूर्प दावी
असी आत्मता सर्वआकार वदावी

पादादिरूपांत हि तोचि हस्ती
स्तंभादिरूपें करुनाचि हस्ती
असाचि तू भासशि वादियांला
तर्कादिशास्त्रांत अनादि यांला
त्या हस्तिचें रूप तथापि सारें
तें नेणती हे कुमते असारें
तसीं न जाणोनि जनांत नाना
कुयुक्तिवादें करिती तनाना
जाच्या मतीं तत्व नसें जनाला
कानीं पडे तेंचि खरें तयाला
तो वाच्य सिध्दांत न या मताचा
निर्वाह त्याचाच असे मनाचा १८

वाच्यांशतावाचक जे प्रबंध
जे वाचितां होति विशेष बंध
वाचांश त्या आणिक वाचकांहीं
तुझाच शक्तीस्तव शक्त कांहीं १९
वदे शब्द शाखीखुणें चंद्र दावी
गुरूनें तुझी गोष्ट ऐसी वदावी
घटाकार-शब्दें स्फुरे श्रोतयांला
तसें तत्वनें तत्व वाटे तयांला २०
मापें जसें मोजिति धान्य पाणी
शब्दें तसा दाविति चक्रपाणी
सर्वांसही शब्दचि जो वदे हा
तूं मूळ त्याही ध्वनिरूप देहा २१
न दुंदुभी दुंदुभिवाद्य नादीं
शब्दामधें तूं न असा अनादी
शब्दास तूं मूळ परंतु शब्दीं
न धुंडितां दीससि कोटिअब्दीं २२
शब्दांत तूं सांपडनासि जेव्हां
कां दाविते वेद गुरूसि तेव्हां
वर्णूनि ही निर्गुण बोधरीती

शाळीचा खुणेनें चंद्रदाखवणें, २ नौबदवाद्य, ३ वर्षानी.
तत्वपाणी, असा हि पाठ आहे.
सेविति असाहि पाठ आहे

ते आश्रय श्रीगुरुचा धरीती
गुरुमुखेंचि गुरूस हि तें कळे
श्रुतिमुखें चि न पावति ये केळे
ह्मणुनि तूंचि अनादि-गुरू-कवी
प्रथम जो विधिला निज शिकवी २४
बहुत युक्ति-बळें उठती मतें
कळति तीन असंमत संमतें
ह्मणुनि वेद निघे तव आननीं
सुपथ दावित जो [3]भवकाननीं २५
त्रिकांड तो वेदहि तूंचि देवा
सकाम निष्कामहि वासुदेवा
विज्ञान-कांडीं निगमत्व-रूपा
नमो नमो जी तुज वंदे रूपा २६
घेतां असा वंदन लाभ लाहो
त्रिकांड-वेदात्मक वर्णिला हो
उपासनाकांड तयांत नारी
वर्णूनियां वंदिति पूतनारी २७
उपासनाकांड निवृत्तकर्में
समर्पणें भागवतैकधर्में
अर्पूनि कर्में तव चारिरूपें

---

१ कळेला, योग्यतेला. २ ब्रह्मदेवास. ३ संसाररूप अरण्याचे ठायीं, ४ पूतनेचा अरी कृष्णा.

ते भाविती संत सुख-स्वरूपें
तूं चित्त-बुधि-मन-आणि अहंकृतींत
स्वात्मा स्वयें स्फुरसि निश्चय हा मतींत
हा व्यूह विष्णु[illegible]-मूर्ति-[illegible]याचा
झाला असे यदुकुळीं अवतार याचा २९
श्रीकृष्ण तूंचि वसुदेवकुमार देवा
चित्तासि जो स्फुरसि केवळ वासुदेवा
जें शुध-सत्व वसुदेव तयासि संज्ञा
हें गुह्य ठाउक असे सकळां अभिज्ञां ३०
सत्वचित्तहि अचेतन देवा
त्यासि जीवन-तसा-वसुदेवा
अन्य तूजविण न प्रिय मानी
मीपणें जरि तनू अभिमानी ३१
शून्य विश्व तुजवांचुनि देवा
वाटतें प्रिय असा वसुदेवा
प्रीतिहेतु वसुदेव-कुमारा
शाम सुंदर बरा सकुमारा ३२
चित्ताख्य सत्व वसुदेव-कुमार देवा
चित्तेंचि तूं स्फुरसि जास्तव वासुदेवा
चित्तेंकरूनि च तुझी परमानुभूती
चित्तींच आत्मपण तूज समस्त भूती ३३

---

१ अहंकारांत, २ खूण, ३ अनुभव.

चित्तेंचि तूं स्फुरसि केवळ सर्वदाहीं
विश्वीं नसो एकदसी वसुदेव-गेहीं
इत्यादि तत्व वसुदेवकुमार देवा
होऊनि तथा प्रकट दाविसि वासुदेवा ३४
चित्तें जसी स्फुरसि तूं सकलांस जैसा
चित्त-प्रकाश वसुदेवकुमार तैसा
संकर्षणाख्य नव-मूर्ति अहंपणांत
तूं राम भासिसि दुजा [illegible] आपणांत ३५
प्रद्युम्न बुद्धि [illegible]
हे मार पुत्र तव देव-[illegible]
नानु हुडआदि अनिरुद्ध [illegible]
ऐसें [illegible] प्रभु तूं न मानी
ज्यांसि [illegible]
ते पाहती [illegible]
जे [illegible]
चित्तादिकीं केवळ या दुदैव ३६
या कारणें सर्वहि जीवराशी
तूंचि स्वयें हे कमळाविलासी
निवेदुनी ईश म्हणूनि नारी
त्या मागुनी वर्णिनि पूतनारी.

१ वसुदेवाचा घरीं, २ संकर्षण--बळराम ही आहे आख्या-नाम ज्याचे.
३ लक्ष्मीपति श्री.

प्रकाशिसी तूं गुण वासुदेवा
गुणींच आच्छादुनि घेसि देवा
गुणाचिया-वृत्तिकरूनि लक्षा-
येसी नमोजी तुज त्या अलक्षा ३९
प्रकाशुनी पाहसि तूं गुणाला
निजप्रकाशें निज-आपणाला
लीला जयाच्या न विकाररूपा
तया नमोजी तुज चित्स्वरूपा ४०
तूं सिध्दिदाता सकळा-विकारा
नमो नमो त्या तुज निर्विकारा
जो वर्तवीता सकळेंद्रियांतें
तो तूं हृषीकेश नमूं तयातें ४१
तूं इंद्रियें वर्तउनी विरक्त
कोठें न होसी विषयानुरक्त
कीं तूं मुनी आदिगुरू मुनीला
नित्य स्वयं मुक्त सरोज[3]-नीला ४२
तूं साक्षि गा सर्व मनोगतीचा
अध्यक्ष तूं सर्व-जगत्पतीचा
न विश्व होऊनि विराटरूप
कीं सर्पही रज्जुच चित्स्वरूप ४३

---

१ अदृश्या, २ ज्या इंद्रियाचें जे कामतें त्या करवीं करिवणारा, ३ सरस्-ज-सरांत झालेलें कमल त्याप्रमाणें नीलवर्ण.

ज्ञानस्वरूपा जडसर्पहारा
द्दष्टुलरूपें करिसी विहारा
तूं कारण स्थावर-जंगमाचें
निमित्य रज्जूच भुजंगमाचें ५४
देखोनियां येरिति पीतवासा
प्रसन्न देखोनि जगन्निवासा
त्या प्रार्थिती श्रीकमलापतीतें
कीं सोडवी आमुचिया पतीतें ५५
प्रकरणीं पुढिल्या जगदीश्वरा
विनवितील असें कमलावरा
करिति वंदन श्रीपतिकामिनी
भुजगिणी यमुना-ह्रदवासिनी ५६
ह्मणुनि भुवनवंद्य हा विलास
त्रिभुवननाथ रचूनिसे विलास
स्मरण करितिजे पदां-बुजाचें
धरि मुकुटावरि शंभु अंबुजाचें ५७
इति विरचित-विलास पांचवा हा
परिसुनि कृष्णपदांबुजीं च वाहा
अजि विभव पहा पदांबुजांचें
धरि मुकुटावरि अंबु शंभु ज्यांचें ५८

उदक-तीर्थ.

अध्याय ६

अंगाकरून वदल्या खळदंड आधीं
हा कष्टला पति असा न धरूनि ओंधी
कीं या-मिसें करुनि होउन तुष्ट देव
प्राणप्रदान पतिचें करु वासुदेव
तों तो प्रसन्न हरि देखियला भला हो
नेदी तथापि पति तो क्षण लाभ लाहो
यानंतरें ह्मणति कीं स्थिर-जंगमातें
तूं बुद्धिदायक तसाच भुजंगमातें
या कारणें यास करीं कृपाच
ह्मणोनि हे श्लोक असेचि पांच
प्रार्थूनि ऐसें कमलापतीला
त्या नागिणी सोडविती पतीला
तूं सूत्रधारी च जनाशयांचा
करूनि सृष्टी स्थिति नाश यांचा
जां ज्यांस संस्कार जसे-रितीचे
उद्बोध तैसे करिसी मतीचे
तूंचि स्वयें प्रेरक वासुदेवा
अन्याय याचा तरि काय देवा

---

१ मनोव्यथा, २ जन-आशय-हृद्गत, ३ उत्तर-बोध-सदुपदेश.

क्षमा करावी जगदेकबंधो[1]
अनंत कारुण्य-गुणैकसिंधो
तूं विश्वरूप तुजवीण दुजें न कांहीं
तूंझीच राजसहि तामस सात्विकांहीं
मूर्ती परंतु तुज साप्रत सात्विका या
झाल्या प्रिया अजि न तामसमूढ-काया ६
शुभ्र सात्विकचि या स्थितिकाळी
आवडे न तनु तामस काळी
हें खरेंचि परि बाप जगाचा
माय बाप तरि तूं भुजगाचा ७
यानंतरें प्रार्थिति या प्रकारें
कीजे क्षमा यावरि निर्विकारें
आजी करावें खलजीवना कीं
हा थोर आम्हा पति जीव नाकीं
अन्याय केला जरि बाळकानें
क्षमा करावा जगपाळकानें
तूं माय बाप स्थिर-जंगमाचा
हा सोसिं अन्याय भुजंगमाचा ८
जो श्री-तनूस डसतां अपराध झाला
तो दंश बाधक नव्हे गरुडध्वजाला

१ जगत्-एक-बंधु- जगाचा तूं एकच निग्रहानुग्रहकर्ता.

याच्या विषें भय जगीं गरुडास नाहीं
तें दुःख देईल कसें गरुडासना ही ॥ १०
किमपि दुःख तुतें गमतें तरी
उपजता तुज कोपहि अंतरीं
तदपि नेणत हा सुर-सत्तमा
तुज अजी डसला पुरुषोत्तमा ॥ ११
मूढ मूर्त्ति हरि या भुजगाची
शांति माउलिच तूं त्रिजगाची
हा चुके न अपराध कराया
तूं क्षमेस न चुके सुरराया ॥ १२
नाडिलेंच भृगुनें तुजलातें
श्लाघ्य होय हृदयीं तुजला तें
गाति या अमृत- आचरणातें
भक्त जे शरण या चरणातें ॥ १३
हे आयके शब्द तदं-गनांचे
रंगीं फणाच्या विविधांग नाचे
तों चालिला प्राण भुजंगमाचा
न भार सोसे स्थिर-जंगमाचा ॥ १४
तें पाहातां काकुळती करीती

१ गरुड आहे आसन ज्याचें अश्या कृष्णाला. २ तत्-अंगना- त्या सर्पस्त्रियांचे,
* मूढ मूर्त्ति हरि या भुजगाची शांति माउलिच तूं त्रिजगाची तूं क्षमा तद-पराध करणया योग्य सिद्ध सुर साधक राया. असाहि पाठ आहे. आणि ग्रंथातील श्लोकापेक्षा याचा अर्थ प्रौढ दिसतो.

त्रैलोक्यनाथास हि लोकरीती
वस्त्रांचळातें पसरूनि दान
त्या मागुती देखुनियां निदान १५
कृष्णाजी अर्जुनि कां न पाहो हा
प्राण कीं त्यजि भुजंग अहाहा
दीसते तनु शवा-सम याची
आस ते इतुकि या समयाची १६
प्राणभीक पतिची करुणातें
मागतों शरण ज्याचरणातें
प्रार्थितों तुज कृपानिपुणासी
दे रमापति अहेवपणासि १७
परमतत्पर ज्या पतिजीवनीं
विनविती यमुना ह्रद-जीवनीं
पतिस सोडिं असा वर मागती
वरिति आपणही परमा गती १८
विनवितों हरि आणिक किंकरीं
तुजचि कीं उपदेशहि हा करीं
कवण धर्म तुझा करितां बरें
स्ववदनें वदिजे कनकां-बरें १९
धर्म भागवत सांग हरी तो

पल्लवानें, २ यमुनेचा डोहांतील उदकांत, ३ सेवकांचे ठायीं, ४ सुवर्णमय वस्त्रपरिधान करणाऱ्या अशा कृष्णानें.

जो समस्त अशुभास हरीतो
भक्ति नाशक अशेषभयांतें
दे तितेंचि न फलां उभयांतें २०
काकुळती येरिति बायकानीं
केली तितें श्रीगुरुराय कानीं
घेउनि आत्मा स्थिर जंगमाचा
पुरे करी दंड भुजंगमचा २१
ऐसी शुकाचार्य परिक्षितीतें
सांगे कथा धन्य करी क्षितीतें
या ऊपरी कालियमोक्षणाची
लीला वदे श्रीकमलेक्षणाची २२
आतां ह्मणे श्रीशुक कीं नृपाळा
ऐशा प्रकारें स्तविनां कृपाळा
आली कृपा त्याच जनार्दनातें
पुरे करी कालियमर्दनातें २३
पायेंकरूनि भुजगाधिप लोटिला हो
हा शेवटी पदरजें शतकोटि लाहो
गुंडाळल्या फणा वरि वर्त्तमाना
झिंझाडुनी टकलितां भुजगेंद्र-माना २४
तो कालिया होउनि सावधान

१ कथीनीं गाय केला-तो कानाचे ठायी घेऊन, २ कमललोचन कृष्णाची, ३ व
ज- शंभर कोटी पदरजें.

देखे रमाकांत दयानिधान
भजावया श्रीगरुडध्वजाला
तत्काळ तो ही नररूप झाला २५
धरुनियां नररूप कृतांजली.
चरण वंदुनि ते हरिचे जळीं
हळु हळू प्रभुसी अतीसंकटें
वदतसे शिशु जेरिति धाकुटें २६
आह्मी ह्मणे उपजतां खळ दुष्ट भारी
कीं क्रोधदीर्घ अतिदारुण कैटभारी
उत्पत्ति केवळ तमोगुण तामसाची
हें तों नव्हें अनृतगोष्टि असीच साची २७
प्राण्यास संस्कार कधीं सुटेना
स्वभावबेडी सहसा तुटेना
श्रीमूर्ति तूझी हरि सारसाक्षी
हें जाणते सार असार साक्षी २८
गुणत्रयें विश्व तुवांचि केलें
नानास्वभावीं विषयीं भुकेलें
प्रकार नानाविध जांत देवा
तूं निर्मिसी सर्वहि वासुदेवा २९
त्यामाजि आह्मी तरि दुष्टजाती
कीं दुष्ट संस्कार कधीं न जाती

१ बालक, २ कमलनयनी.

माया तुझी हे कशिही त्यजावी
हे दुस्तरा केविं तरोनि जावी
बोलोनि आतां बहु कोण काम
दोहींस ही कारण पूर्णकाम
सर्वज्ञ तूं बांधिसि सोडवीसी
अनादि हे गोष्टि नव्हे नवीसी
स्वयेंच देऊनि अशा प्रवृत्ती
स्वयेंच दावी खळ उद्वृत्ती
हें कां ह्मणावें तरि आकळेना
सर्वज्ञ जो त्याविण हें कळेना ३२
वैषम्य त्याला तरि बोलवेना
वाग्देवता येरितिनें लवेना
उगेंचि त्याच्या चरणीं भजावें
तूं रक्षिं ऐसें शरणार्थ जावें ३३
यालागिं आतां करणेंचि दंड
करीं तरी आणिक ही उदंड
कृपा करावी जरि हेंचि वाटे
सर्वज्ञ तूं लाविं तशाच वाटे ३४
हरिपुढें पसरी फणि विग्रहा
ह्मणतसे अजि टांकुनि आग्रहा
जरि दया तरि दाविं अनुग्रहा

१ तरावयास अशक्य, २ देहाला.

करि परी अथवा अतिनिग्रहा ३५
शुक ह्मणे शरणा गति हे खरी
भुजग जे वदला निजवैखरी
परिसतां हरि त्याप्रति बोलेतो
धरणिनायक.आयक बोल तो ३६
क्षमा दुरन्याय्य करूनि देव
जें बोलिला त्याप्रति वासुदेव
तें नों विलासीं पुढिल्या पहावें
परा परांधास असें सहावें ३७
सर्वापराधी खळ दुष्ट भारी
दावी तरी शांतिचे कैटभारी
ऐसी क्षमा तोचि मुकुंदभक्त
कीं त्यास कोण्ही न दिसे विभक्त ३८
जिव्हा स्वदांतें रगडी कदापी
दुःखें तरी तो कवणासि दापी
हरीचिया भक्तजनाचिमाजी
सर्वात्मभावें असि हे क्षमा जी ३९
उरीं भृगूची हरि लात सोसी
ऐसी क्षमेचीच सदां असोसी
क्षमा धरूं वृत्ति असी मनाची
प्रार्थी हरीतें मति वामनाची ४०
ऐसा क्षमानामक हा विलास

रचून त्यां तूं हरि सेविलास
क्षमा मला दे अजि वासुदेवा
सर्वात्मभक्तीचि करूनि देवा ४१

अध्याय ७

आत्मा सम स्थावर-जंगमाचा
क्षमा दुरन्याय[1] भुजंगमाचा
करी हरी घेउनि शब्द कानीं
निवेदिलें जें अजि बायकानीं १
तयावरी प्रार्थियला अहीनें
प्रपन्नरीती मदगर्वहीनें
आतां तया उत्तर देव देतो
नृपाप्रति श्रीशुकही वदे तो २
शुक ह्मणे मृदु शब्द वदे असे
हरिपुढें फणि तो पडला असे
परिसतां प्रभु वैखरि-बोलतो
नृपति सादर आयके बोल तो ३
नको येथें राहों गमन करिं डोहा त्यजुनियां
स्वबंधूसीं सिंधूप्रात निजगृहा जाइं जुनियां

1 सर्पाचा दुष्ट अन्याय.

विलंबानें टाकीं व्रजजनतटाकीं तळमळी
तटा जाणें जाण त्वरित मजला पादकमळीं ४
केला क्षमा यद्यपि त्यास दंड
धन्यत्वही त्यास दिल्हें उदंड
लावी असा दापुनि त्यास वाटे
दुष्टास त्या त्रासचि फार वाटे ५
बोलेल जें दापुनि अप्रमेय[1]
हें वर्णिजेनें पुढिल प्रमेय
अध्याय जो या दशमीं निसावा
हा श्लोक नेथील जसा विसावा ६
वाणी न येथें वदली शुकाची
वाचा पुढें वर्णिल गोपिकांची
कीं बोल हे गातिल गोपिकांहीं
ह्मणोनि येथें न वदेचि कांहीं ७
शब्द हे वदति गोपनायका
कां ह्मणाल तरि तेंचि आयका
यामिसें हरिचरित्रहि ने घे
वैखरी सफलता करूनी घे ८
श्रीरासरंगीं हरि रंगला हो
त्याहूनि आधीं रतिरंग लाहो

1 ज्याचें प्रमाण करितां येत नाहीं असा कृष्ण.

गोपास रे कृष्ण अनेकरीती
तों गोपिका गर्व मनें करीती
हुडकितां अवघीच वसुंधरा
व्रजवधू चतुरा अतिसुंदरा
हरिस त्या भजती हरिमध्यमा
वदति यैरिति भारति मध्यमा १०
असा तिहीं गर्व मनांत केला
न गोष्टिचा या हरि तो भुकेला
न गर्व जाला लवलेश साहे
सोसील तो गोष्टि असी कसा हे ११
त्यांचा असा गर्व हरावयाला
प्रसाद ही त्यांस करावयाला
अदृश्य झाला भवदुःखहंता
त्यांची हराया अवघी अहंता १२
अदृश्य होतां हरि गोपकांता
आकांत मांडुनि तया स्वकांता
धुंडावया हिंडति जा वनांत
अर्पूनि चित्तें जगजीवनांत १३
काहींनिघे तुंछपिशाचदेहीं
नाचे जसा देह तसा वदे ही

१ सिंव्ह कटी, २ वाणी वैखरि, ३ दुःखरूप भव-संसाराचा नाशकर्ता, ४ वेड्या पिशाचासारिखा.
* होऊनि वेड्या फिरति वनांत, असाहि पाठआहे

हरी जयाच्या हृदयीं निघाला
आलाचि पूर्वस्थितिलागीं घाला १४
लीला हरीच्या जन ते करीती
टाकूनियां पूर्विल लोकरीती
जांच्या मनीं लौकिक लाज नाहीं
होऊनि वेडे न भिती जनां ही १५
ऐशा अवस्था व्रजकामिनींच्या
कृष्णात्मबुध्दी गजगामिनींच्या
जे ते ह्मणे गौळण मी हरी तो
जो सर्वदुःखें स्मरतां हरीतो १६
त्या खेळती खेळ जनार्दनाचे
त्या नाचती जेविं मुकुंद नाचे
त्या रांगती जेविं हि रांगला हो
घेती वियोगांतहि संग लाहो १७
करीती चरित्रें मनःपूत नारी
स्वयें होउनी पूतना पूतनारी
हरी होय तीच्या मुखीं थान घाली
व्रजीं पूतना होउनी जे निघाली १८
तृणावर्त ने जेविं कृष्णा उदारा

प्रपंचाला, २ कृष्णरूपी आपण अशा ज्यांचा बुद्धि- कृष्ण आत्मा आहे, ३ म
ालापवित्र, ४ पूतना-अरि-पूतनाशत्रु, ५ तृणावर्त या नावाचा वायूरूपी राक्षस.
गेल्याच देहात्मकबुद्धी ज्यांच्या, असा हि पाठ आहे.

तसे खेळती खेळ गोपाळदारा
तृणावर्त जे गोळियांची कुमारी
तिला गोपिका कृष्ण होऊनि मारी १९
यशोदा अजी होय ते त्यास मां जी
हरी होय जे बांधते तीस मांजी
फुलांचे बहू हार मानूनि दावी
अशीं कौतुकें तीं किती हो वदावीं २०
होते शिळारूपचि वृष्टि भारी
रक्षीं व्रजाला मधुकैटभारी
ऐशा स्त्रिया बोलति त्यांत नारी
बोले असें होउनि पूतनारी २१
भिऊं नका रक्षिन मी हरी तो
भया समस्तांसहि जो हरीतो
ह्मणोनि गोवर्धनरूप हातीं
घे वस्त्र तीतें सकळा पहाती २२
कीर्तनांत हरि दास करीती
विष्णुचा विविध कौतुकरीती
मानसीं हरिविलासमयांत
रामता प्रकट जा समयांत २३
श्रीरामरूपी शर चाप हातीं

१ माता, २ मध्यें, ३ गोवर्धना प्रमाणें वस्त्र, ४ हरिविलासमय-विलासरूप.

हा भाव गाती हरिचा पहाती
ते दाविती श्रीहरिदास ठाणें
प्रेमें मनाचीं उठतां उठाणें २४

गोपरूपहरिहृत्सदनांत
प्रेम-गान-रस तो वदनांत
बुद्धि तन्मय-पणास धरीते
वेणु दावित तइं अधरीं ते २५

प्रेमविव्हल असावध रीती
विष्णुचे विविध भाव धरीती
नाचती विविध ते हरिदास
त्यागुनी सकळ लाज उदास २६

लोक पाप तृणपावकरीती
विष्णुदास हरिभाव करीती
नृत्य गायन मुकुंदचरित्रीं
धन्य ते त्रिभुवनांत धरित्री २७

ऐशाच लीला करिती उदारा
रात्रीं वनाभीतरिं गोपदारा
क्रीडा तिहीं देखियेल्याच होत्या
तैशा स्वयें आचरती अहो त्या २८

मधुर सर्व कथा हरिची खरी

१ गोपरूप हरीच्या हृदयरूपगृहांत, २ प्रेमानें व्याकुळ, ३ तृणाला जसा अग्नि दहन करितो.

परि वदे चरितांतर वैखरी
अजि जियेस्तव रासकथा निघे
मन कथेस तियेस निघोनि घे
'कालिया ह्मणवि गौळणि तीतें
पाळथी करूनियां युवतीतें
मी हरी ह्मणुनि तीवरि नाचे
भाव ते करि शिरीं नटनाचे ३०
शिरीं कालियाच्या तिणें माधवाचा
जसा देखिला नाच तैशाच वाचा
तिणें आइकील्या वदे त्याप्रकारें
दवावी भुजंगास कृष्णानुकारें ३१
पूर्वार्ध नंदन पराशर नंदनाचा
बोले प्रकार अजि कालियमर्दनाचा
आतां प्रमेय पुढिल्या चरणद्वयाचें
गोपी वदे वचन तें अजअद्वयाचें ३२
गमन तूं करिं दुष्ट भुजंगमा
परम बाधिसि जो स्थिर-जंगमा
वळखसी न खळा खळमर्दना
पशुपनंदन रूप जनार्दना ३३
मी जगीं प्रकटलों खलदंडा

---

१ चरित-अंतर-दुसरें चरित, २ तरूणस्त्रीतें ३ कृष्ण - अनुकार-कृष्णाप्रमाणें, ४ पुत्र-शुकाचार्य, ५ पराशराचा नंदन-व्यास, ६ अज-जन्मरहित आणि अद्वय-ज्यांवांचून दुसरा नाहीं-एक, ७ दुष्टाचा मर्दन कर्त्ता मी त्या मला, ८ पशु तें पालन करणार जो

कारणें तुजसेमाच उदंडा.
दंडिल्या बहुत म्यां खल जाती
देह सांडुनि अनर्गल ज्यांनीं ३४
दटाविला येरिति कृष्णाजीनें
ह्मणोनियां गोपवधूंत जीनें
प्रकार हे कालियमर्दनाचे
केले वदे शब्द जनार्दनाचे ३५
यानंतरें प्रस्तुत बोलता हे
न आयका शब्द-सुधालता हे
विषें तुझ्या हें जल तीव्र जातें
नें कंटकप्राय अति व्रजातें ३६
ह्मणूनि बोलेल हरी खळाला
त्याचा असा गर्व जगीं गळाला
तें तों विलासीं पुढिल्या पहावें
लीलाविलासांत असें रहावें ३७
विलास हा सप्तम माधवाचा
लीलाविलासाख्य रचूनि वाचा
अर्पी तया शामल-सुंदरातें
श्रीइंदिरेच्या प्रियमंदिरातें ३८
लीलाविलासें च चरित्र-माला
खेळोनि गोपी पुरुषोत्तमाला
गाती तराया सकळांस नावें

[illegible] २ प्रतिबंध न होतां ३ [illegible]

लीलाविलासाख्य ह्मणूनि नांव ३१

अध्याय ८

सर्पास्यानंतर वासुदेव
निरोप देतो अजि देवदेव
तो आयका शब्द-विलास कानें
जें वर्णिलें श्रीहरि-चें शुकानें १

दंडूनि केलें मजला क्षमा जी
आतां असों दे यमुनेचि माजी
प्रार्थी ह्मणी हेंचि भुजंग मातें +
ह्मणूनि बोलेच भुजंगमातें २

जळ पिती करितील निमज्जन
पशुपगोवळ गौळणि मज्जन *
तवविषें अति दूषित जीवन
क्षण न लागत नाशिल जीवन ३

ह्मणुनि टाकुनियां यमुनाह्रदा
त्वरित जाइं ह्मणे खलदुर्हृदा
वर हि देउनियां कमलावरें
दवडिलाच फणी जगदीश्वरें ४

---

१ सत्वर, २ स्नान, ३ मज्जन- माझेंजन, ४ पाणी, ५ प्राण. + मला.
* स्वपशु गौळणि गोवळ सज्जन असाहि पाठ आहे.

ऱ्हदजळांतहि म्यां गरुडासनें
गुणकथा रचिल्या तव शासनें
स्मरति जे जन सांज सकाळिया
न तुमचें भय पावति काळिया ५
विष तुझें न तयां करि भस्म रे
सतत हें खलशासन जो स्मरे
तुज जई न तयांसहि पाहवे
व्रजसमीप करें वद राहवें ६
जातां वरें येथुनि तूज साच
दावी हरीभाव अजी असाच
हें दीडपद्यें हरि बोलिला हो
देऊनियां ही वरदान लाहो ७
देउनी किमपि अन्य वरातें
बोलतो हरि भुजंगवरातें
कीं करीं खरिन रे गमनातें
ये स्थळीं धरिं उदास मनातें ८
परमतीर्थ अनःपुर हें जन
करिति जे पितृतर्पण सज्जन
स्मरति हें ममशासन कौतुकें
जळति पापकुळें भवहेतुकें ९

१ भागवतांतरीं दीड श्लोकीं असा भावार्थ. २ लाभ, ३ जन्ममरणाला कारणभूत.

यांत जों जय भुजंगम-सेना
तीर्थरूपपण यास दिसेना
भाव कीं धरिं मनीं गमनातें
ये स्थळीं करि उदास मनातें
लाभ त्यांस न धरा उभयांचा
धाक ज्यास खगराजभयाचा
कीं ऱ्हदांतुनि भुजंग निघेना
तोंचि तो गरुड हा सुड घेना ११
द्वीप जें रमणक स्वकुळाचें
स्थान थोर सकळां भुजगांचें
त्या स्थळीं खवळुनी गरुडाला
सर्प या ऱ्हद-जळांत दडाला १२
हे कथा शुक पुढें नृपतीतें
सांगणार पुसतां नृप तीतें
या ऱ्हदीं च खगराज निघेना
चंचुनीर-भरि येउनि घे ना १३
दिशा दहा ही स्वतपें भरीतो
वसे जळीं यां ऋषि सौभरी तो
खगेंद्र एकेसमयीं भुकेला
आहार या नीरचरींच केला १४

---

१ तीर्थासारखें, २ सर्पांस, ३ बाहेरपडण्याचा किंवा आंत राहण्याचा, ४ गरुडभयाचा, ५ भेट, ६ नामविशेष, ७ कथा, ८ जाईना, ९ पाण्यांतील प्राण्याचे ठायीं.

नको ह्मणे सौभरि सर्वथा रे
तें भक्षिल्यावांचुनि तो भ थारे
तों बोलिला सौभरि एक राया
त्या प्राणियांलागि सुखी कराया १५
खगेंद्र या ऊपरि हा तटाकीं
येऊनि यां याकरि हान टांकी
मरेल तत्काळ पुनः न वांचे
हें बोलतों मी निजसत्यवाचे १६
गोष्टि हे समजली गरुडाला
तो भिऊनि अतिशीघ्र उडाला
सर्प त्यास खवळूनि दडाला
या*जळीं स्थळ न अन्य जडाला[1] १७
त्रास हा हरितसे भुजगाचा
मायबाप हरि सर्व जगाचा
कीं खगेंद्र-भय तूज असेना
जाइं घेउनि भुजंगमसेना १८
भुजंगातें देतो वरद वर जो सर्व हि जगा
ह्मणे ज्याच्या त्रासें निजरमणक द्वीप भुजगा
स्वयें तूं टाकूनी ह्रद धरुनि यां यांत असशी
न तो पक्षी[2] भक्षी तुज सहजही जेथ वससी १९

१ जडस्वरूपी सर्पाला, २ गरुड.
*: तैं वदे हरिच त्याच जडाला असाहि पाठ आहे.

भय तुझें हरिलेंच समस्त कीं
चरण म्यां दिधले तव मस्तकीं
सकळ सर्पकुळां जरि दापितो
गरुड खाय कदापि तुतें न तो २०
भयनिवारण हा वर लाधला
पदरजें परमार्थ हि साधला
भुजग आणिखि नागिणि बायका
पुजित पूंजित[1] तें अजि आयका २१
ह्मणे शुक प्राण जना मृतांतें*
मानूनि जैसें वचनामृतातें
त्या नागिणी नाग निरंजना[2]तें
नमूनियां मांडिति पूजनातें २२
गंधा फुला अंबर-भूषणातें
अर्पूनि-यां त्या व्रजभूषणा[3]तें
पुसोनियां श्रीकरुणांबुधी[4]तें
भुजंग गेला अजि अंबुधीतें २३
जेव्हां प्रयाणा-प्रति सिद्ध झाला
वंदूनियां श्रीगरुडध्वजाला
प्रदक्षिणा त्या खल शिक्षणातें
करूनि गेला कमलेक्षणातें २४

---

१ पूज्य अशा कृष्णातें, २ निःअंजन मायारहित कृष्णातें, ३ कृष्णातें, ४ करुणेचा सागर अशा कृष्णातें. * शवास.

स्त्रिया लेंकरें सोहिरे साप सारे
बहूकाळ डोहांत ज्याचे पसारे
सवें चालिले काळियाच्या समुद्रा
मुकुंदांघ्रिपद्में शिरीं ज्यास मुद्रा ॥ २५

भुजंग स्वयें सर्व ही नीचजाती
नदींतूनि पाण्यांमधूनीच जाती
विषाचीं कुळें चालिलीं क्षिप्र संगें
भुजंगेंद्र सर्वांस लक्षी प्रसंगें ॥ २६

जाती जळीं भार भुजंगमाचे
संहार कर्ते स्थिर-जंगमाचे
सर्पांविणें ज्यांत दुजें दिसेना
कीं त्याचिया स्त्री-तनयादि सेना ॥ २७

भुजंग स्वयें सर्व ही एकजाती
भुजंगाधिपा लागि वेष्टूनि जाती
भुजंगप्रयातांत या श्लोकवृत्तीं
गणाची जसी एकजाती प्रवृत्ती ॥ २८

असी चालतां स्त्रीकुमारादि-सेना
विषाचा नदीमाजि भारा दिसेना
त्यजी काम तो निस्पृही नेवि झाली
महावासनां आगि ही ने विझाली ॥ २९

कादिनांचि खलसाप रमेशें

---

१ एकजात, २ श्लोकांत एक वृत्त (छंद) आहे यांत सर्व यगण असतात, ३ रमा-ईश्वर पति. * स्पृहासूटतां निस्पृहा तें विझाली असा हि पाठ आहे.

ते नदी अमृत त्या परमेशें
ठविली करुनि कौतुकवाणी
तें नृपा-प्रति वदे शुकवाणी ३०
सुटे स्पर्शतां प्राण ज्या जीवनांतें
समीरें करी भस्म ज्या जीवनातें
करी त्याच नीरें जगज्जीवनातें
स्मरा हो स्मरा त्या जगज्जीवनातें ३१
दिसे सौम्य गेले महाव्याळजीचे
अहो स्पर्शतां पाय गोपाळजीचे
विषाचे विझाले जळीं क्षिप्र ताप
त्रिलोकेशपादांबुजांचे प्रताप ३२
होती विषें उग्र यमानुजा ते
संतप्त जीचें जल भानुजा ते
झाली नदी दिव्य सुधारसाची
कृपा हरीच्या पदसारसांची ३३
उष्णरश्मितनया नियमाची
जे सहोदरबहीण यमाची
दुष्टसंग हि युगें भुजगाचा
उद्धरी निरस हि नाथ जगाचा ३४
होता भुजंगें हृदउष्ण जीचा

१ जगत्-जीवन.जगाचें संरक्षण, २ कृष्णातें,३ यमुनेचे, ४ लोकत्रयाच्या स्वामीच्या पादकमलाचा.५ यमाची बहिण,६ सूर्याची कन्या,७ पदकमलांची,८ सूर्याची तनया,९ बहुकाळ असा अर्थ. * पाण्यातें. + प्राण्यातें.

नखेंदु लागे तिस कृष्णाजीचा
तो होय तत्काळ सुधे समान
हृदें जया या वसुधेस मान ३५
हरिविलास सुधारसनाम हा
परम तारक सर्व जनां महा
विषजलास सुधारसनायका
नमन हें भवसागरतारका ३६
शोधिली रविसुता परमेशें
नाशिले सकळ ताप रमेशें
क्रोधकाम दवडी स्वजनाचे
काळियावरि जसा संज नाचे ३७
हरिकथारस नित्य नवा मना
प्रियपदार्थ अनित्य न वासना
तरि च शोधुनि जीव नदीस तो
मतिस या जगजीवन दीसतो ३८

अध्याय ९

करुनि शुद्ध अजी हृदनिर्हृदा
दवडितां चि खळा अति दुर्हृदा

१नखचंद्र, २पृथ्वी सारिखी शांत असा अर्थ, ३साज घातलेल्या सारखा.

नदितटाप्रति ये व्रजनायक
व्रजजनां सकळां सुखदायक
प्राण ज्या निघति मानव देहीं
तो उठे खडबडूनि वदे ही
ये रिती उठति ते व्रजवासी
धांवती धरुनि तीव्र-जवांसी २
कळ्यावरुनियां उळ्या प्रथम टांकुनी त्या गळ्या
गळे पशुप भेटती नटतडां भुजीं आंगळ्या
फुगोनि तनु फाटती मणगटीं कडीं दाटती
सुखें अमित वाटती विरहसिंधु ते आटती ३
जैलजलोचनि त्या व्रजकामिनी
जलदसुंदर देखुनि भामिनी
नयनिं पाहुनि तृप्ति नव्हे मना
अधिक वाढविती स्मरकामना ४
फुगति देखुनि सुंदरि सुंदरा
गमतसे सुखरूप वसुंधरा
तटतटी कुच कंचुकि फाटती
विरहसिंधु अशेषहि आटती ५
देखतां अनुज तो अभिराम
क्षेम दे बहु बळें बळराम

१ कृष्ण. २ आंगठ्या ३ कमलनेत्रा. ४ मेघा सारखा सुंदरवर्ण ज्याचा तो. ५ मदनतेग़. ६ सर्व, ** वेगास.

हांसतां मुख-सुधाकर पाहे
नित्य नूतन मुकुंद-कृपा हे
हास्य देखुनि करी अनुजाला
भाव कीं मज चि शोक न झाला
कीं मला अमित विक्रम ठावा
शोक कां मग मनांत करावा ७
नंद नंदनमुखा अवलोकी
धन्य आपण चि मानव लोकीं
भेटतां सकळ वीसरला हो
नंद घे श्रुतिअगम्य हि लाहो ८
वर्णितां न अकळे निगमातें
मूर्ति वंदित असे मग मातें
पोटिसीं दृढ धरी घननीळा
सोडवे न हरि तो जननीला ९
स्तनयुगीं फुटला सहसा रस
स्रवनि जीवनें लोचनसारस
विसरली अजि तूंपण मीपण
सुत सुखी अवलोकुनि आपण १०
श्रीवत्सांका श्रीयशोदा स्वअंकीं
घेतां प्रेमा मोजवे तो न अंकीं

१ मुखचंद्र, २ पराक्रम, ३ ठाऊक, ४ एकाएकी, ५ ढाळती, ६ पाणी, ७ नेत्रकमलें, ८ श्रीवत्सलांछनास, ९ अंकमोडणीनें. ∗ वेदातें.

१त्याले गातां वृंदे वेदश्रुतीचे
त्याच्या देहीं वर्षती अश्रु तीचे
प्रेमयुक्त न असी जननी च
श्रीव्रजांत किं अजीजन नीच
शोधता व्रजवधूजन-पाळा
ही असा शुक ह्मणे जनपाळा
वत्स धेनु वृषभांसह सारे
पाहतां हरिस त्या सहसा रे
अर्पिती नयनिं दृष्टि निघेना
तृप्ति लेश मन मानुनि घेना १३
आनंद झाला व्रय-बालुरांला
आनंद झाला गगनीं सुरांला
आनंद झाला धरणीस भारी
स्पर्शे पदाब्जें जिस कैटभारी १४
आनंदनाम स्मरतांच वाचे
आनंद गातां गुण माधवाचे
आनंद हा नित्य नवा मनाचा
आनंद आत्मा प्रिय वामनाचा १५
आनंद तो दशशतानन तो न मोजी
आनंददे व्रजजनांस तया नमोजी
आनंदनामक विलास असा हरीचा

१ सम्प्रदाय, २ घेरा, ३ राज्याला, ४ कृष्ण. * सर्वजन.

आनंद आवरण वारण केसरीचा १६
देहबुद्धि यमुना-ह्रदं यांत.
क्षुब्ध-कालियमना हृदयांत
कामपन्नग न कंटक थारे
हे स्मराल जरि कृष्णकथा रे १७
तरि धरा हरिची बहु तीव्र जीं
हरि असे तुमच्या च मति-व्रजीं
हरि रुचे स्मरतां बरवा मना
करि दया कनकांबर वामना १८
कलियुगीं जरि कृष्णकथारती
तरि न हे भवकंटक थारती
जित चि मुक्ति-पदीं तरि थारसी
जरि मना रमसील कथारसीं १९

हरिविलाससमाप्त.

स्मे, १ भवदुःखाचे कांटे

स्फुटश्लोक

मातें न सेवी जन तो सुटेना
संसारबेडी सहसा तुटेना
सेया करावी तरि पूर्णकाम
मी कांय माझें करणार काम १

खरारा खगेंद्राशि माझ्या कराया
न कोण्ही मला पाहिजे लोकराया
न लागे जया घांस दाणा न पाणी
उभा जो पुढें नित्य जोडोनि पाणी २

लगामाविणें माझिया जो लगामीं
विनाजीन वाहे मला [illegible]।
अशा वाहना लागि तों मानसाची
अपेक्षा नसे गोष्टि हे मानसाची ३

धरुनि मोहरि तुल्य असे जगा
दशशतानन तो मज सेज गा
नर तया जरि अस्तरणाची
इतर कार्यहि तो करणाची ४

कीं दीप लाविल अरे गुणहीन धामीं
जेथें पितों त्रिभुवनात्मक ते सुधा मी

१ संसार दुःखापासून न सुटे असा अर्थ. २ अर्जुना, ३ हात, ४ आकाशमार्गीगमन करणारा, ५ मनाची, ६ सहस्रमुख- शेष, ७ आथरुण, ८ करणारच. * सेजेचीसेवा

जेथें न सूर्य न शशी न शिखी न तारा
तेथें निघेल दिनरात्रिस काय थारा
ज्ञानांबरें स्वसुखकंचुकि जीस तीचीं
वस्त्रें कसीं धुयिल कोण रमेसतीचीं
कीं खेळऊनि उचलील मुला विधीनें
माझ्या करील जन हा कवण्या विधीनें ६
मी नित्य तृप्त मज रांधिल अन्न काय
मर्दील अंग तरि केवळ मी अकाय
जो मी अनंत मज रक्षिल तो कसा रे
व्यापूनि जो उरतसे जनलोक सारे ७
सेविल्याविण नसे सुटकाही
सेवणें तरि घडे नच कांहीं
सेउनी सहजही तुज पाय
पांडवा परिस तोचि उपाय ८
स्वकृत लौकिक वैदिक पांडवा
मज समर्पुनि तूं करिं तांडवा
करिसि होमिसि भक्षिसि देशि रे
मज मध्येंच समर्पित तें शिरे
कलियुग चवथें हें दोष-सिंधूच सारा
सकळहि नरकाच्या साधनाचा पसारा

१ अग्नि, २ कामातें, ३ कायारहित, ४ पावे ५ नृत्य, ६ होमकरतोस, ७ अर्पण केलेले.

परि हरिगुणलीला सत्कथा यांत सारा
त्यजुनि सकल धंदा कीर्तनीं काळ सारीं १०
गाऊनियां मधुर हें हरिनाम नाचा
पाहों मग भ्रमकसा हरिना मनाचा
तत्रापि कीर्तनचि मुख्य कलौं करीतो
होतो तया प्रकट तारक लौकरी तो ११
कुऱ्हाडीच्या घायाप्रति तरु जसा कां तुटतसे
अहो आयुष्याचे दिनरजनि घायें स्फुट तसे
न देहाची ऐशा वय समजतां ऊर उलतो
तया साधे ऐसा कुनर विषयां तेंच भुलतो १२

[redacted]



१ उत्तमा, २ वेचा, ३ कलियुगांत, ४ तारण कर्ता भगवान्; ५ व्यक्त-स्पष्ट ६ मर्यादा.

वामनपंडित कृत कृष्णचरित्राचें शुद्धिपत्र.

कृष्णजन्म

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
१	४	हरिविण	हरि-विण.
२	११	आनंद-सिंधु सलिलांत	आनंद-सिंधु सलिलांत
"	१८	८ भूषणें	८ बाहु-भूषणें
३	९	क्षीप्र	क्षिप्र
३	११	खेळ-खळीं	खेळ खेळीं
"	१३	घनःशामल हरी	घनश्यामल हरी
४	१	सखि	सखि
५	६	त्याचिभ जिजे	त्याचि भजिजे

उखलबंधन

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
८	९	प्रभुचा	प्रभुच्या
"	१८	३ महा-उदधी-महासाग	३ महा-उदधी-महासागर
९	१८.	हरीहा नि	हरी-हानि
१०	४	सुखें-वदावी	सुखें वदावी
"	१२	करीं	करां
११	२.	स्त्री-प्रकृती-स्वभावें	स्त्री-प्रकृति-स्वभावें
१२	१४	ह्मणोनि	ह्मणोनी
१६	२४	वार्ता	वार्ता
१७	२१	प्रेमे	प्रेमें
"	२२	३ स्वकर्मानें बंधन पाव णारांस	३ स्वकर्मानें बंधन पावलेल्यास.
१८	२	त्यालागिहि	त्यालागिंहि
"	१६	प्रेमेच	प्रेमेंच

बाळक्रीडा

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
१९	६	वेणु वर्नांच	वेणु-वर्नांच. (वेळवाच्या वनांत)
१९	१७	उठनी चपेटे	उठनीच पेटे (टोंग)

पृष्ठ.	पंक्ति	अशुद्ध.	शुद्ध.
१९	१[illegible]	लीळा	लीला.
	१९	मुने उंबरा आमुचा	मुते उंबरां आमुच्या
		आणि ह्मगे	आणि ह्मगे
"	२०	१ शेंस्यांवर	१ अग्नि.
२०	२[illegible]	त्याचि माजि	त्यचि-माजी
२१	६	भरितसें	भरितसे
"	१५	ना वरती	नाः वरती
२२	२१	वदेन ह्मणं	वदेन ह्मणें
"	२२	३ मत्त स्त्रियांचामद	३ स्त्रियांचा मद
२३	३	तुजचि मारवुं	तुजचि मार वुं
२४	२	ऐशाधिटा या	ऐशा धिटाया
"	५	त्यासि	त्यांसि
"	६	माने प्रति	माने-प्रति
"	८	एव मर्थ	एवमर्थ
"	२०	आह्मी ह्मणो	आह्मीं ह्मणों
"	२१	तुज तुल्य	तुज-तुल्य
२५	१४	असोशी	असोसी
	२१	नित्य जांत	नित्य ज्यांत
२६	९	जलधि मध्यें	जलधि-मध्यें
"	१३	हलुहलुच	हलु हलूंच
२७	७	धरीं	धरी
२८	२	घनः शामला	घनश्यामला
"	१५	अकस्मात	अकस्मात्
२९	८	वाम-कराःबुजातें	वाम-करांःबुजानें
"	१३	रेखिलें	रेखिले
३२	१४	वधूनी	वधूनीं
"	१८	आंतडी	आँतडीं
३३	२१	करवि-	करविं-

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
३७	३	थापटुं.	थापटूं.

वनसुधा

४१	१६	वनभोजन हेतु.	वनभोजनहेतु
,,	१८	अधासुर	अघासुर
४२	२२	२ गोपाळाचें	२ गवळ्यांचे
४४	२	भ्रू नटातें	भ्रू-नटातें
,,	१०	वनी देखती	वनीं देखती
४६	४	अश्या	अशा
,,	१९	स्थिर चरात्मक	स्थिर-चरात्मक
४८	१२	शिशुवृंदें	शिशु-वृंद
४९	१२	भरवसा	भंरवसा
४९	१७	वाजविनी	वाजवीनी
५०	२१	म ज्जना	मज्जना
५३	१०	उठती	ऊठती
५७	१२	दुर्वांकुर	दूर्वांकुर
,,	१९	वर्त्तमान	वर्तमान
५८	९	प्रारब्ध योगें	प्रारब्ध-योगे
,,	११	दुरदृष्टी	दूर-दृष्टी
,,	१५	स्वभोग्यत्व	स्वभोक्तृत्व
६०	१४	श्रीशाम	श्री श्याम
,,	२१	भोंवती	भोंवतीं
६१	३	भवाकोन पत्रें	भंगाकोन पत्रें
,,	७	रसवि भागवतांत	रस विभा-गवतांत ह्मणजे तेजरहित गवतांत चिन्मयरूप भगवान असा भाव. पहिला चरण भागवतांत ह्म० भागवत ग्रंथरूप श्रीपति २ रा चरण भागवतांत ह्म० भक्तमंडळीं ३ रा चरण भागवतांत ह्म० भागवत ग्रंथांत.

पृष्ठं.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
"	१५	फणि फणांवरि	फणि-फणांवरि
६२	१५	भाग तांत	भागवतांत
६३	१०	हा रुजे	हार जे
"	१५	फणि फणावरी	फणि-फणावरि
"	२०	ज्यांचा	ज्याचा
६५	२	धरातळ सेजे	धरातळ-सेजें
"	५	सर्प विष	सर्प-विष
६६	१४	तिघां लागीं	तिघा-लागिं
"	२०	विशेषीं	विशेषी
६७	२	कृष्णाफणी	कृष्ण-फणि
"	४	सागराप्रती	सागरा-प्रति
६८	१२	हृदोद्रक-	ऱ्हदोद्रक
"	१८	गरळानळआ हे	गरळानळआहे ह्म० गरळ रूप अग्नीची ज्वाळा
६९	८	प्राणि यांचा	प्राणियांच्या
"	१९	तटाकी	तटाकीं
७०	१६	विषाचा	विषाच्या
७२	१४	शामसुंदर	श्यामसुंदर
"	१५	मद हास्य	मंद हास्य
"	१९	ऱ्हदयांबुजांत	हृदयांऽबुजांत
७६	५	हरीचा	हरीच्या
७७	८	निवारूं	निवारूं
७८	२	ज्याचा	ज्याच्या
८१	१७	दिनया-मिनी	दिन-यामिनीं
८२	५	गोप-पाला	गोप-पाळा
"	६	कपाला	कपाळा
"	११	येथूनि	येथुनि

पृष्ठें	पंक्ति	अशुद्ध	शुद्ध
८३	१९	करील	करिल
८४	१२	सदेवें	सदेवें,
”	७	जगत्याम	जगध्दाम
८५	८	निर्नाण	निमार्ण
”	१९	धरी	धरि
८८	१५	कालियांतें	कालियानें
”	२०	करीमदनासि तो	करीमदनाशि तो
८९	१८	अर्पियेली	अर्पियली
९०	७	गुरु तें	गुरू तें
९६	१०	कृपेने	कृपेनें
”	१४	उपदेसी	उपदेशीं
९८	१०	तुझाच	तुझ्याच
९९	७	तुम्ह लाहे	तुम्हला हो
”	८	लाहे	लाहो
”	१०	विभूतीं	विभूती
”	११	भूतदयेविना हीं	भूतदयेबिना, हीं
”	१५	हासा	हातां
१०१	५	मुनिंद्र	मुनीद्र
१०२	८	सरवादिक	सुरवादिक
”	१०	शरणागती	शरणागतीं
”	१२	सिध्दिहि	सिद्धिहि
१०३	२०	तुझें	तूझें
१०४	४	कर्णी	कर्णीं
”	५	दुखें	दुःखें
”	७	नुज	तुज
”	१५	पतीचा	पतीच्या
”	१८	१ सर्पाचा	१ सर्पाच्या
१०५	११	अनंत शक्ती	अनंत शक्ति

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
,,	२०	तुझ्या	तूझ्या
,,	२१	पाहासी	पाहसी
,,	२६	१ टीप. अश्या सर्प०	१ अशासर्प०
१०६	७	ईझ्रा	ईश्र
,,	९	स्वानुभूति	स्वानुभूत
,,	१३	सत्शास्त्र	सच्छात्र
१०७	८	स्तंबरूपेंचि	स्तंभरूपेंचि
१०९	१५	वदेरूपा	वेदरूपा
११०	१८	शाम-सुंदर	श्याम-सुंदर
,,	१९	वसुदेव	वसुदेव
,,	२०	भूती	भूमीं
११३	३	द्रष्टुत्वरूपें	द्रष्टृत्वरूपें
११४	६	साप्रत	सांप्रत
११६	३	देईल	देइल
११७	३	वस्त्रांचळानें	वस्त्रांचेळातें
,,	[illegible]	आहेत पणासि	आहेवपणासी
१२०	१६	दापी	दापी
१२०	१७	आद्यक	आद्क
१२५	३	लार्गा	लागिं
१२९	१९	शामल	श्यामल
१३९	१२	अकळें	अकळे

स्फुटश्लोक

१४२	८	संसारपेडी	संसारवेडी
,,	१७	अस्तरणाची	अस्तरणारची
,,	१८	करणाची	करणारची
१४३	४	ज्ञानांबरे	ज्ञानांबरें
१४५	९	आयुष्या	आयुष्याचें